# BVG INDIA LIMITED

Humanity Ahead

A BHARAT VIKAS GROUP COMPANY

CIN : U74999PN2002PLC016834

**CORPORATE OFFICE:**
Midas Tower, 4th Floor, Rajiv Gandhi Infotech Park,
Phase 1, Hinjawadi, Pune, Maharashtra 411057.
Tel. : +91 20 3509 0000
info@bvgindia.com | www.bvgindia.com


Date: 01 February 2023

To,

**Honorable Principal,**
**H. V. Desai College,**
**Pune**

**Subject: Collaboration Proposal for Heritage Walk Program**

Respected Sir,

I am composing this correspondence to formally request your cooperation in the organization of the 'Heritage Walk' program, scheduled to commence from February 19, 2023 till February 19, 2024.

This initiative will be conducted in partnership with the History Department of H. V. Desai College, Club Heritage, and BVG India Limited. We are seeking your esteemed support and collaboration in this event.

It brings us great pleasure to announce that daily Maharashtra Times has graciously agreed to serve as the media partner for this endeavour. The program entails the organization of a Heritage Walk, encompassing logistical considerations such as venue selection, scheduling, etc., all of which will be overseen by H. V. Desai College. Furthermore, a dedicated website will be established to showcase photographs and speeches related to the program. BVG India Limited has undertaken the responsibility for the technical development of the website and the subsequent upload of content.

Thank you,

Yours sincerely,

HGaikwad

Vaishali H Gaikwad
Head- Corporate Affairs

Dr.Rajendra G. Gurao

Digitally signed by Dr.Rajendra G. Gurao
Date: 2024.02.27 13:49:06 +05'30'

# 'राज्याचा इतिहास जागतिक पातळीवर नेण्याची गरज'

**हणमंतराव गायकवाड यांचे प्रतिपादन**



**'हेरिटेज वॉक'निमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर.**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'राज्याचा इतिहास आणि भूगोल जागतिक पातळीवर नेण्याची गरज आहे,' असे प्रतिपादन 'भारत विकास ग्रुप'चे चेअरमन हणमंतराव गायकवाड यांनी केले.

'भारत विकास ग्रुप इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालय' यांच्यातर्फे आयोजित 'हेरिटेज वॉक' उपक्रमाचे उद्घाटन गायकवाड यांच्या हस्ते झाले. एच. व्ही. देसाई महाविद्यालयात शिवजयंतीचे औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

या प्रसंगी गायकवाड यांनी उपस्थितांशी संवाद साधला. 'हेरिटेज वॉक ही आठवड्यातून एकदा करण्याची गोष्ट नसून, ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे,' असे मतही त्यांनी या वेळी व्यक्त केले. प्रमुख वक्ते आणि महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी या प्रसंगी शिवचरित्रावर संवाद साधला. या उपक्रमाचा मागील काही वर्षांचा थोडक्यात आढावा घेऊन त्यांनी शिवचरित्रातील काही चित्तवेधक प्रसंग सांगितले.

शिवछत्रपतींचा वारसा, जंजिरा व गोवा मुक्तीसाठी मराठ्यांनी केलेले प्रयत्न याची त्यांनी साधार मांडणी केली. छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांनी मुघलांविरुद्ध दिलेल्या लढ्याचा रोमहर्षक इतिहास सांगून संताजी घोरपडे यांनी औरंगजेबाच्या छावणीचे कळस कापले, त्याची गोष्ट श्रोत्यांच्या अंगावर काटे आणणारी ठरली. इयत्ता अकरावीच्या शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यांनी या प्रसंगी शिवजन्माचा पाळणा आणि पोवाडा सादर केला.

उद्योजक कल्याण तावरे यांनी हेरिटेज वॉक उपक्रमाच्या सातत्याबाबत भाष्य केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव यांनी अशा कार्यक्रमांना 'द पूना गुजराती मंडळा'चा कायमच पाठिंबा असल्याचे सांगितले. मंडळाचे जॉइंट सेक्रेटरी दिलीपभाई जगड, विनोदकुमार देदीयास, वैशाली गायकवाड आदी या वेळी उपस्थित होते. उपप्राचार्या डॉ. अर्चना पंडित यांनी प्रास्ताविक केले. गार्गी राऊत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. गणेश खुटवड यांनी सूत्रसंचालन केले. विनय वाघमारे यांनी आभार मानले. अथर्व वरपे, नवनाथ सुपेकर, वरुण परब, गणेश अभिमाने, साक्षी कांबळे, गुणवंत बांदल यांनी संयोजन केले.

**Heritage Walk Inauguration Ceremony**
**H. V. Desai College of Arts, Science and Commerce**
**19/02/2023**

# 'फर्ग्युसन'मध्ये उद्या 'हेरिटेज वॉक'

## स्वातंत्र्यवीरांची खोली पाहण्याची रविवारी संधी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे मराठी मनाचा अभिमानबिंदू. आपल्या प्रेरणादायी कार्यकर्तृत्वाने सावरकरांनी समाजासमोर देशाभिमानाचा आदर्श ठेवला. सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणी जागविण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. उद्या, रविवारी (२६ फेब्रुवारी) फर्ग्युसन कॉलेजमध्ये 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने कॉलेजच्या वसतिगृहातील त्यांची खोली सावरकरप्रेमींना पाहता येणार आहे. सकाळी ८.४५ वाजता हा 'हेरिटेज वॉक' होणार आहे.

'भारत विकास ग्रुप इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज पुणे,' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. इतिहासतज्ज्ञ प्रा. मोहन शेटे या वॉकमध्ये उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. येथील ऐतिहासिक वास्तूची व तिथे घडलेल्या इतिहासाची माहिती देणार आहेत. डेक्कन एज्युकेशन सोसायटी सव्वाशे वर्षांपेक्षा जास्त मोठी परंपरा असणारी शिक्षण संस्था आहे. या संस्थेच्या फर्ग्युसन महाविद्यालयास ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. 'हेरिटेज वॉक'मध्ये महाविद्यालयाची ऐतिहासिक इमारत व ॲम्फी थिएटर या वास्तू दाखविण्यात येणार आहेत. त्यासह क्रांतिकारक वासुदेव बळवंत गोगटे यांनी हॉटसन या इंग्रज अधिकाऱ्यास ठार करण्याचा प्रयत्न केला, तो प्रसंग येथील ऐतिहासिक जागेवर ऐकविण्यात येईल.

ज्येष्ठ साहित्यिक राम गणेश गडकरी उर्फ गोविंदाग्रज यांची खोलीही दाखवली जाणार आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे निवासस्थान वर्षातून फक्त दोन दिवस खुले असते. स्वातंत्र्यवीर विद्यार्थीदशेत असताना १९०२ ते १९०५ या कालावधीत या खोलीत वास्तव्यास होते. २६ फेब्रुवारी या दिवशी सावरकरांची पुण्यतिथी असल्यामुळे त्या खोलीचे दर्शन 'हेरिटेज वॉक'मध्ये सहभागी झालेल्यांना घेता येईल. 'बीव्हीजी' कंपनीच्या सामाजिक प्रकल्प विभागाचे प्रमुख रवी घाटे या वेळी उपस्थित राहणार आहेत. फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्रसिंह परदेशी यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या 'हेरिटेज वॉक'मध्ये सहभागी होणाऱ्यांनी सकाळी साडेआठ वाजता फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी जमायचे आहे.


स्वप्नील शिंदे

फर्ग्युसन महाविद्यालयातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांची खोली.

- **केव्हा :** रविवार, २६ फेब्रुवारी
- **कुठे :** फर्ग्युसन महाविद्यालय
- **वेळ :** सकाळी ८.३०
- **काय पाहता येईल :** स्वातंत्र्यवीर सावरकर यांची खोली, राम गणेश गडकरी यांची खोली

# 'हेरिटेज वॉक'मध्ये प्रेरणादायी इतिहासाची उजळणी

### 'फर्ग्युसन'मधील कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

स्वातंत्र्यवीर सावरकर, ज्येष्ठ नाटककार राम गणेश गडकरी उर्फ कवी गोविंदाग्रज आणि क्रांतिकारक वासुदेव बळवंत गोगटे यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती जाणून घेण्याची संधी इतिहासप्रेमींना रविवारी मिळाली. निमित्त होते 'भारत विकास ग्रुप इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज पुणे' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्यातर्फे आयोजित 'हेरिटेज वॉक' उपक्रमाचे.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारात झालेल्या या उपक्रमाला वारसा आणि इतिहासप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

इतिहासतज्ज्ञ प्रा. मोहन शेटे यांनी या उपक्रमात उपस्थितांशी संवाद साधला. 'स्वातंत्र्यवीर सावरकर प्रखर देशभक्त होते. त्यांची वैचारिक जडणघडण फर्ग्युसन महाविद्यालयात झाली. या काळात त्यांनी व्यायाम करून शरीरसंपदा कमावली. ग्रंथालयात मराठी, इंग्रजी, संस्कृत ग्रंथांचे वाचन केले. अनेक निबंध लिहिले. सिंहगडाचा पोवाडा, बाजीप्रभूंचा पोवाडा गाजला. त्यांनी विधवांचे दु:ख सांगणारे काव्यही लिहिले. त्यांचे कार्य प्रखर देशभक्तीचे ज्वलंत उदाहरण आहे,' असे शेटे यांनी सांगितले. स्वातंत्र्यवीरांच्या पुण्यतिथीनिमित्त 'फर्ग्युसन'च्या वसतिगृहातीलत सावरकरांच्या खोलीतील प्रतिमेस उपस्थितांनी अभिवादन केले. ज्येष्ठ नाटककार राम गणेश गडकरी हेदेखील 'फर्ग्युसन'चे विद्यार्थी होते. याच महाविद्यालयात त्यांनी इंग्रजी नाटककार शेक्सपिअरचे अध्ययन केले. पुढे त्यांनी लिहिलेल्या अप्रतिम नाटकांमुळे त्यांनाच 'मराठीचे शेक्सपिअर' म्हटले जाऊ लागल्याची माहितीही शेटे यांनी दिली.

'महाविद्यालयाच्या वाडिया ग्रंथालयात २२ जुलै १९३१ रोजी क्रांतिकारक वासुदेव बळवंत गोगटे यांनी हॉटसन या इंग्रज अधिकाऱ्याला मारण्याचा प्रयत्न केला होता. विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली, ती राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या हेतूने आणि देश-विदेशात कीर्ती मिळवणारे अनेक विद्यार्थी याच महाविद्यालयातून निर्माण झाले. याच महाविद्यालयातून दोन पंतप्रधानही शिकले,' असेही त्यांनी सांगितले.

प्रा. गणेश राऊत यांनी ग्रंथालयाची माहिती दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्रसिंह परदेशी यांचा सत्कार करण्यात आला. 'बीव्हीजी' कंपनीच्या सामाजिक प्रकल्प विभागाचे प्रमुख रवी घाटे आणि उद्योजक कल्याण तावरे या वेळी उपस्थित होते. उमेश पोटे आणि विनयन वाघमारे यांनी संयोजन केले.



फर्ग्युसन महाविद्यालयात झालेल्या 'हेरिटेज वॉक' या उपक्रमात वारसाप्रेमींशी संवाद साधताना इतिहासतज्ज्ञ प्रा. मोहन शेटे.

**Ferguson College**

**26/02/2023**

# अनुभवा भूशास्त्रीय आविष्कार

## 'हेरिटेज वॉक'मध्ये पुणेकरांना मिळणार संधी

प्रातिनिधिक छायाचित्र



म. टा. प्रतिनिधी, पुणे

'रोपीलाव्हा', 'अमीग्डलॉयडल बेसॉल्ट', 'लाव्हा पेन्सिल' या संकल्पना जाणून घेण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. उद्या, रविवारी (५ मार्च) हनुमान टेकडी येथे 'हेरिटेज वॉक' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकमध्ये हे भूशास्त्रीय आविष्कार अनुभवण्याची आणि जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार असून, सकाळी ८ वाजता 'हेरिटेज वॉक' होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज पुणे' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या वॉकमध्ये ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ, गिर्यारोहक आणि लेखक प्रा. प्र. के. घाणेकर उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. या वॉकमध्ये हनुमान टेकडी व परिसरातील भूशास्त्रीय संकल्पना समजून घेता येतील. यामध्ये 'रोपीलाव्हा', 'अमीग्डलॉयडल बेसॉल्ट', 'लाव्हा पेन्सिल' किंवा 'व्हेसिक्युलर बेसॉल्ट', 'कॉम्पॅक्ट बेसॉल्ट' आणि 'पापुद्री खडक' दाखवले जाणार आहेत. याशिवाय मराठी साहित्यातील अजरामर असा रविकिरण मंडळाचा कट्टा, दगडाची खाण, एव्हरेस्ट मोहिमेवर गेलेल्या गिर्यारोहकांची सरावाची जागा, हिंद सेवक समाज; तसेच नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे स्मरण आणि त्यांचे योगदान याची माहितीही जाणून घेता येणार आहे. पेन्शनर मारुती, बारतोंडी वनस्पती, उंदीरमारी वनस्पती पाहण्याची संधीही उपस्थितांना मिळणार आहे. या वॉकमध्ये सहभागी होणाऱ्यांनी टोपी आणि पाण्याची बाटली सोबत आणणे आवश्यक आहे. या 'हेरिटेज वॉक'मध्ये शक्यतो शूज घालून यावे. उपक्रमात सहभागी होणाऱ्यांनी सकाळी ७.३० वाजता गोखले इन्स्टिट्यूटच्या प्रवेशद्वारापाशी जमायचे आहे. अधिक माहितीसाठी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# हेरिटेज वॉकमध्ये ओळख भौगोलिक वारशाची

म. टा. प्रतिनिधी, पुणे



हेरिटेज वॉक या उपक्रमात संवाद साधताना प्रा. प्र. के. घाणेकर.

साडेतीन कोटी वर्षांपूर्वीचे खडक आपण आज आपल्या शहरातही पाहू शकतो, ही गोष्ट वारसाप्रेमींना चकित करणारी ठरली. निमित्त होते हेरिटेज वॉकचे. 'बीव्हीजी इंडिया लि.', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे हनुमान टेकडी येथे झालेल्या या वॉकला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. 'गोखले इन्स्टिट्यूट'चे प्रवेशद्वार ते पेन्शनर मारुती या परिसराला या उपक्रमात भेट देण्यात आली. ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ, गिर्यारोहक व लेखक प्रा. प्र. के. घाणेकर यांनी. रोपी लाव्हा, 'बारतोंडी' आणि 'उंदीरमारी' या वनस्पती 'पेन्सिल लाव्हा', मांजऱ्या खडक, बिट्टी झाड, घायपात याची माहिती दिली. टेकडीवरील हिंद सेवक समाजाच्या स्तंभासह पेन्शनर मारुती व 'रवीकिरण कट्टा'ही उपस्थितांना दाखविण्यात आला. गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजित रानडे या वेळी उपस्थित होते. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. 'बीव्हीजी'चे रवी घाटे यांनी आभार मानले. उमेश पोटे व विनयन वाघमारे यांनी संयोजन केले. वरुण परब यांनी आभार मानले.

**Hanuman Tekdi**

**05/03/2023**

# केळकर संग्रहालयात रविवारी हेरिटेज वॉक

## वारसा जाणून घेण्याची संधी

म. टा. प्रतिनिधी, पुणे



■ काय : हेरिटेज वॉक

■ कुठे : राजा दिनकर केळकर संग्रहालय

■ केव्हा : रविवार, १२ मार्च

■ वेळ : सायंकाळी ४.३०

इतिहासातला संपन्न वारसा जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. 'बीव्हीजी इंडिया लि.', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्यातर्फे रविवारी (१२ मार्च) थोरले बाजीराव रस्त्यावरील राजा दिनकर केळकर संग्रहालय येथे सायंकाळी साडेचार वाजता 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

इतिहास अभ्यासक डॉ. अजित आपटे या वॉकमध्ये उपस्थितांना संग्रहालयाची माहिती देणार आहेत. संग्रहालयाचे संचालक सुधन्वा रानडे हे संग्रहालयाची उभारणी कशी झाली, याची माहिती देणार आहेत. एच. व्ही. देसाई महाविद्यालयातील इतिहासाच्या व्याख्यात्या ज्योती राऊत 'संग्रहालयांची उपयुक्तता' या विषयावर संवाद साधणार आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना संग्रहालयातील तीन दालने, वस्तू जतन प्रक्रिया, शस्त्रास्त्रे, मूर्ती, वाद्ये, मस्तानी महाल, लाकडी छत, देशभरातील उत्तम दरवाजे या गोष्टी दाखविण्यात येणार आहेत.

संग्रहालयातील 'हेरिटेज वॉक'प्रसंगी ज्यांना मोबाइलवर फोटो अथवा व्हिडिओ चित्रीकरण करायचे आहे, त्यांना स्वतंत्र शुल्क भरावे लागणार आहे. सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक असणार आहे. अधिक माहिती आणि नोंदणीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# घडली संपन्न वारशाची ओळख

## राजा दिनकर केळकर संग्रहालयात हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे



राजा दिनकर केळकर संग्रहालयात आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आपल्या संपन्न वारशाची ओळख करून देणारे दुर्मीळ पेहराव, दिवे, पुस्तके आणि पोथ्या अशा विविध कालखंडातील वस्तू पाहण्याची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, थोरले बाजीराव रस्त्यावरील राजा दिनकर केळकर संग्रहालयात आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाची. 'बीव्हीजी इंडिया लि', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग' यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या प्रसंगी प्रमुख वक्ते अजित आपटे यांनी उपस्थितांना राजा केळकर संग्रहालयातील विविध वस्तूंची माहिती सांगितली. मराठाकालीन शस्त्रास्त्रे आणि त्यांचे उपयोगही त्यांनी सांगितले. संग्रहालयाचे संस्थापक दिनकरराव केळकर यांनी इतिहासात जी मोलाची भर इतिहासात घातली, त्याचा आढावाही आपटे यांनी घेतला. संग्रहालयाचे प्रमुख सुधन्वा रानडे यांनी दिनकरराव केळकर यांच्या कार्याची माहिती दिली. 'केळकर यांनी फकिरी पत्करली; परंतु संग्रहालय क्षेत्रात त्यांनी राजेशाही कार्य केले,' अशा शब्दांत रानडे यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. प्रा. ज्योती राऊत यांनी प्राचीन भारतातील संग्रहालयांचा आढावा घेतला. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी शस्त्रास्त्रांचा संग्रह, मस्तानी महाल यांची माहिती दिली. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या कार्यावरही त्यांनी प्रकाश टाकला. रवी घाटे यांनी उपस्थितांना आरोग्यदायी योजनांचे प्रशिक्षण दिले. 'केळकर संग्रहालय हे पुणेकरांचे भूषण आहे. आपण ते जपायला हवे,' अशा शब्दांत हणमंतराव गायकवाड यांनी संग्रहालयाचे कौतुक केले. उमेश पोटे आणि वरुण परब यांनी संयोजन केले.

**Raja Dinkar Kelkar Museum**

**12/03/2023**

# जाणून घ्या नाना वाड्याचा इतिहास

## हेरिटेज वॉकचे रविवारी आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे



ऐतिहासिक स्थित्यंतरांच्या साक्षीदार असणाऱ्या अनेक वास्तू पुण्यात आहेत. त्यापैकीच एक म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील नाना वाडा. या वाड्याचे अंतरंग आणि इतिहास जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. येत्या रविवारी (१९ मार्च) या वाड्यात हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेआठ वाजता हा हेरिटेज वॉक होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लि.', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. शहरातील प्रसिद्ध अशा लालमहाल आणि शनिवारवाडा या वारसास्थळांजवळच नाना वाड्याची वास्तू आहे. या वास्तूसह इतिहासातील अनेक रंजक घटना या वॉकमध्ये जाणून घेता येणार आहे.

### वारसाप्रेमींसाठी संधी

- **काय :** हेरिटेज वॉक
- **कोठे :** नाना वाडा
- **केव्हा :** रविवार, १९ मार्च
- **वेळ :** सकाळी ८.३०

इतिहास संशोधक प्रा. मोहन शेटे या वॉकमध्ये वाड्याची माहिती देणार आहेत. पुढील आठवड्यात होणाऱ्या 'शहीद दिना'चे (२३ मार्च) औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ मार्च हा भगतसिंग, सुखदेव व राजगुरू या थोर क्रांतिकारकांचा हौतात्म्य दिन आहे. क्रांतिकारक राजगुरू हे न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी होते. विद्यार्थीदशेत त्यांचे शिक्षण नानावाड्यात झाले. या वाड्याशी संबंधित असणारे आणखी एक विख्यात क्रांतिकारक म्हणजे हुतात्मा भाई कोतवाल. अशा दोघांच्या कारकिर्दीचा आढावाही यावेळी घेतला जाणार आहे. नाना फडणीसांच्या कार्याची माहिती दिली जाईल. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२० ९२३३२ किंवा ८०५५७ ६७६११ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# नाना वाड्यात इतिहासाची उजळणी

## हेरिटेज वॉकला उत्स्फूर्त प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे



हुतात्मा दिनाचे औचित्य साधून नाना वाडा येथे आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमात उपस्थितांना वाड्यासह क्रांतिकारकांची माहिती देताना प्रा. मोहन शेटे.

'भले बुद्धीचे सागर नाना' असे ज्यांचे वर्णन केले जाते ते नाना फडणीस आणि त्यांचा वाडा; तसेच याच नाना वाड्यात इंग्रजांच्या काळात डेक्कन एज्युकेशन सोसायटीने सुरू केलेल्या शाळेचे दोन सुपुत्र हुतात्मा राजगुरू आणि भाई कोतवाल यांच्या आठवणी वारसाप्रेमींनी जागविल्या. निमित्त होते, २३ मार्च या हुतात्मा दिनाचे औचित्य साधून आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे. नाना वाडा इथे झालेल्या या उपक्रमाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'बीव्हीजी इंडिया लि.', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग' यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. मोहन शेटे यांनी आपल्या अनोख्या शैलीत नाना फडणीस, हुतात्मा भाई कोतवाल, क्रांतिकारक राजगुरू यांच्या आठवणींचे भांडार उलगडून उपस्थितांना अंतर्मुख केले. नानांच्या कार्याला उजाळा देताना शेटे म्हणाले, 'निजामाच्या दरबारात पेशवे आणि नाना यांचा योग्य मान राखण्यात आला नाही. याचा राग वकील गोविंदपंत काळे यांना आला. त्यांनी पुणे दरबाराकडे धाव घेतली. सवाई माधवराव पेशवे आणि नाना फडणीस यांनी निजामाला धडा शिकविण्याचे ठरविले. साऱ्या भारतातून मराठ्यांच्या फौजा पुण्यात आल्या. खर्डा येथे लढाई झाली आणि या लढाईत मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. सवाई माधवराव पेशवे आणि नाना या दोघांच्याही कारकिर्दीतला हा देदीप्यमान विजय होय.'

पुढे याच नाना वाड्यात इंग्रजांच्या काळात डेक्कन एज्युकेशन सोसायटीने शाळा सुरू केली होती. या शाळेचे हुतात्मा राजगुरू आणि भाई कोतवाल हे सुपुत्र आहेत. क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृती आणि हौतात्म्यानिमित्त २३ मार्च हा 'हुतात्मा दिन' म्हणून ओळखला जातो. पुणे जिल्ह्यातील खेड (आजचे राजगुरुनगर) ते अखिल भारतीय पातळीवर पोहोचलेले क्रांतिकारक असा राजगुरूंचा प्रवास थक्क करणारा आहे. हुतात्मा भाई कोतवाल हे १९४२च्या 'छोडो भारत' या चळवळीतील एक प्रमुख नाव. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी इंग्रजांविरोधात लढा दिला. विजेचे खांब पाडणे, दळणवळण खंडित करणे, रेल्वेचे रूळ उखडणे अशा किती तरी कृत्यांमधून त्यांनी इंग्रजांना जेरीस आणले होते ही माहिती व त्यांच्या हौतात्म्याची कथा ऐकताना उपस्थित भावूक झाले. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव या वेळी उपस्थित होते. रवी घाटे आणि उमेश पोटे यांनी संयोजन केले.

**Nana Waada**

**19/03/2023**

# प्रार्थना समाजात रविवारी 'हेरिटेज वॉक'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

संग्रहित छायाचित्र




महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांच्या इतिहासात संस्थात्मक चळवळींचे स्थान महत्त्वाचे आहे. अशाच एका संस्थेसह या संस्थात्मक सुधारणांच्या इतिहासाची उजळणी करण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. बुधवार पेठेतील पासोड्या विठोबा मंदिराजवळील प्रार्थना समाज येथे उद्या रविवारी (२६ मार्च) हेरिटेज वॉक या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी दहा वाजता हा हेरिटेज वॉक होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लि.', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. ३१ मार्च २०२३ रोजी प्रार्थना समाजाच्या स्थापनेला १५६ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त हा वॉक होत आहे. या वॉकमध्ये राज्यातील संस्थात्मक चळवळी आणि विचारप्रक्रियेबद्दलची माहिती जाणून घेता येईल. महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष आणि इतिहासाचे प्राध्यापक प्रा. डॉ. राजा दीक्षित प्रार्थना समाजाच्या योगदानाची माहिती देतील. समाजाचे प्रमुख प्रा. डॉ. दिलीप जोग आणि प्रा. डॉ. सुषमा जोग प्रार्थना समाजाची उपासना घेतील. या वॉकमध्ये सहभागी होण्याची इच्छा असणाऱ्यांनी सकाळी पावणेदहा वाजता प्रार्थना समाजाच्या प्रवेशद्वाराजवळ जमायचे आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ यांच्याशी संपर्क साधावा.

# 'ऐतिहासिक साक्षरतेची गरज'

## हेरिटेज वॉक उपक्रमात प्रा. डॉ. राजा दीक्षित यांचे मत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'आज समाजात ऐतिहासिक साक्षरता निर्माण होण्याची गरज आहे. ऐतिहासिक तथ्ये, वास्तु, कागदपत्रे, परंपरा यांच्या संदर्भात समाजात ऐतिहासिक साक्षरता निर्माण झाल्यास वारशाच्या जतनाचे महत्त्वही कळेल,' असे मत प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केले. निमित्त होते प्रार्थना समाजाच्या बुधवार पेठ येथील सभागृहात आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया लि.', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्यातर्फे आयोजित उपक्रमाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

मार्च २०२३मध्ये प्रार्थना समाजाच्या स्थापनेला १५६ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे प्रार्थना समाजाचे डॉ. दिलीप जोग यांनी समाजाची उपासनापद्धती उपस्थितांना समजावून सांगितली, तर डॉ. सुषमा जोग यांनी ही उपासना करवून घेतली. या प्रसंगी डॉ. दीक्षित यांनी प्रार्थना समाजाचा इतिहास आणि विचारसरणीबाबत माहिती दिली. 'ईश्वर एकच आहे. तोच सर्वांचा निर्माता आहे. ईश्वर उपासनेचे मार्ग म्हणजे सत्य, सदाचार व भक्ती. या मार्गांचा अवलंब केल्यास परमेश्वर प्रसन्न होतो. स्वतःच्या आत्मिक उन्नतीसाठी प्रत्येकाने प्रार्थना करावयाची आहे. अन्य कोणत्याही फळाची अपेक्षा सभासदाने ठेवू नये. सर्वांनी आपसात बंधूभाव जागृत ठेवावा,' यावर डॉ. दीक्षित यांनी भाष्य केले.



प्रार्थना समाजाच्या बुधवार पेठ येथील सभागृहात आयोजित हेरिटेज वॉक उपक्रमात सहभागी झालेले नागरिक.

प्रार्थना समाजाचे मुखपत्र असलेल्या सुबोधपत्रिकेची माहितीही डॉ. दीक्षित यांनी दिली. चार मे १८७३ रोजी मराठी, इंग्रजी आणि गुजराती अशा तीन भाषेत हे पत्र प्रसिद्ध होत असे. त्याची किंमत रुपये एक पैसा होती. या पत्राचे ब्रीदवाक्य 'सत्यमेव जयते' असे होते. हे मूळचे मंडुकोपनिषदातले वाक्य. पुढे ते भारत सरकारने स्वीकारले. या प्रसंगी डॉ. दीक्षित यांनी न्या. रानडे यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचे वेगळेपण, इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मंडळीकरण आणि महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे मोठेपणही सांगितले. प्रार्थना समाजाशी संबंधित स्त्री कार्यकर्त्यांच्या योगदानाची माहितीही डॉ. दीक्षित यांनी दिली.

प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी डॉ. दीक्षित यांचा परिचय करून दिला. उमेश पोटे, विनयन वाघमारे आणि वरुण परब यांनी संयोजन केले. रवी घाटे यांनी आभार मानले.

**Hari Mandir Prarthana Samaj**

**26/03/2023**

# हेरिटेज वॉकचे रविवारी आयोजन

**पुणे :** पुण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण उद्यान परंपरेतील उद्यान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील (सिंहगड रस्ता) पु. ल. देशपांडे उद्यानात रविवारी (दोन एप्रिल) 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी साडेसात वाजता हा वॉक होणार आहे. 'बीव्हीजी इंडिया लि,' 'क्लब हेरिटेज पुणे' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्यातर्फे हा उपक्रम होत आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' उपक्रमाचा 'मीडिया पार्टनर' आहे. वॉकमध्ये पर्यावरणशास्त्र विभागाचे अभ्यासक ज्ञानेश राठोड आणि सायली ढोले उपस्थितांना माहिती देणार आहेत. राठोड आणि ढोले हे दोघेही दीर्घकाळ पर्यावरणशास्त्र या विषयात अध्यापनाचे काम करीत आहेत. पु. ल. देशपांडे उद्यान जपानी पद्धतीवर आधारित असून, ते मैत्रीचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. या उद्यानाच्या उभारणीत मोलाचे योगदान असणारे यशवंत खैरे या प्रसंगी संवाद साधणार आहेत. झाडांची उंची मोजण्याचे तंत्रज्ञान, वय मोजण्याचे शास्त्र याचीही माहिती दिली जाणार आहे. वॉकमध्ये सहभागी होणाऱ्यांनी सकाळी सव्वासात वाजेपर्यंत उद्यानाच्या प्रवेशद्वाराजवळ जमावे.



पु. ल. देशपांडे उद्यानात आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाला निसर्गप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. (इनसेटमध्ये) माजी उद्यान अधीक्षक यशवंत खैरे.

# वारसाप्रेमी रमले 'मैत्री उद्याना'त

**'हेरिटेज वॉक'ला उदंड प्रतिसाद**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

वीस एकरांत पसरलेली बाग पुणेकरांच्याच नव्हे, तर भारतीयांच्या आकर्षणाचा बिंदू कशी ठरली, हे जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यानात आयोजित 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया प्रा. लि.', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे आयोजित या उपक्रमात पुणे महानगरपालिकेचे माजी उद्यान अधीक्षक यशवंत खैरे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

खैरे यांनी ओसाड जागा ते भारत-जपान यांच्यातील मैत्रीचे प्रतीक असणारे उद्यान, अर्थात 'ओकायामा उद्यान' म्हणजेच पु. ल. देशपांडे उद्यान कसे घडले याची गोष्ट सांगितली. 'सरकारची इच्छाशक्ती, नोकरशाहीची मदत आणि स्थानिकांचे सहकार्य यामुळे हे उद्यान उभे राहिले. यासाठी हजारो ट्रक माती गोळा करण्यात आली. पुणे महानगरपालिकेच्या उद्यानातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण घेण्यासाठी जपानमध्ये पाठविण्यात आले. प्रशिक्षण घेऊन आलेल्या कर्मचाऱ्यांनी एक स्वप्न पाहिले आणि जिद्दीने ते पूर्ण केले,' असे खैरे यांनी सांगितले.


या प्रसंगी देसाई महाविद्यालयातील पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख ज्ञानेश राठोड यांनी पर्यावरणाक्षेत्रातील आधुनिक घडामोडींची माहिती दिली. महाविद्यालयातील पर्यावरण शास्त्र विभागातील सहायक प्राध्यापिका सायली ढोले यांनी नगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड भागातील वृक्षगणनेची माहिती दिली. उभयतांनी उपस्थितांना झाडे मोजण्याची पद्धत, झाडांची उंची मोजण्याची पद्धत व त्यासाठी लागणारी सामग्री दाखविली. कमीत कमी साधने वापरून झाडाची उंची कशी मोजता येते याचे प्रात्यक्षिकही त्यांनी दाखविले. प्रा. विलीना इनामदार यांनी बागेतील झाडांची माहिती दिली. विनयन वाघमारे आणि वरूण परब यांनी तज्ज्ञांची ओळख करून दिली. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. उमेश पोटे व कुणाल कदम यांनी संयोजन केले. रवी घाटे यांनी आभार मानले.

**P. L. Deshpande (Okayama) Garden**

**02/04/2023**

# शनिवारवाड्यात उद्या 'हेरिटेज वॉक'

फाइल फोटो



## सकाळी आठ वाजता सुरुवात

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पेशवाईतील अनेक स्थित्यंतरांचा साक्षीदार म्हणून शनिवारवाड्याकडे पाहिले जाते. मराठी साम्राज्याच्या वैभवापासून ते पारतंत्र्यापर्यंत अनेक घडामोडींची ही वास्तू साक्षीदार आहे. ही वास्तू आणि तिथे घडलेल्या इतिहासाची उजळणी करण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. येत्या रविवारी (९ एप्रिल) शनिवारवाड्यात हेरिटेज वॉक या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेआठ वाजता हा उपक्रम होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लि.,' 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या वॉकमध्ये प्रा. डॉ. गणेश राऊत हे शनिवारवाड्याचा इतिहास सांगणार आहेत. शनिवारवाडा ही शहराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात भर घालणारी वास्तू. १० जानेवारी १७३० रोजी या वाड्याची पायाभरणी झाली. २२ जानेवारी १७३२ रोजी वास्तूशांत झाली. १७५० मध्ये आजची तटबंदी उभारली गेली. थोरले बाजीराव पेशवे ते अखेरचे दुसरे बाजीराव पेशवे अशी परंपरा या वाड्याने पाहिली. वाड्याशी संबंधित विविध गोष्टी या वॉकमध्ये जाणून घेता येतील. या कार्यक्रमात लेखक आणि माजी सनदी अधिकारी ज्ञानेश्वर मुळे व पुणे शहराचे सहपोलिस आयुक्त संदीप कर्णिकही उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२० ९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**Shaniwar Wada**

**09/04/2023**

# जाणून घ्या ऐतिहासिक त्रिशुंड गणपतीची गोष्ट

## 'हेरिटेज वॉक'चे रविवारी आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहराच्या वैशिष्ट्यपूर्ण दैवत परंपरेतील त्रिशुंड गणपतीची गोष्ट जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, रविवारी (१६ एप्रिल) सोमवार पेठेतील त्रिशुंड गणपती मंदिरात हेरिटेज वॉक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी साडेचार वाजता हा हेरिटेज वॉक होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

प्रा. प्र. के. घाणेकर हे त्रिशुंड गणपती व मंदिराची माहिती देणार आहेत. त्रिशुंड गणपती मंदिर पुण्याच्या सांस्कृतिक



त्रिशुंड गणपती मंदिराचे प्रवेशद्वार.

आणि ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणारे ठिकाण आहे. या मंदिरावरील शिल्पकाम आवर्जून बघण्यासारखे आहे. स्थापत्य व शिल्पशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना हे ठिकाण नेहमीच मोहून टाकते. सोमवार पेठेतील हे मंदिर इसवी सन १७५४ ते १७७० या काळात बांधले गेल्याची शक्यता अभ्यासक वर्तवितात.

त्रिशुंड गणपती मंदिराची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. वैशिष्ट्यपूर्ण शिल्पे असणारे हे पुण्यातील एकमेव मंदिर आहे. वारसाप्रेमींना हे मंदिर व गणरायाच्या मूर्तीची तपशीलवार माहिती जाणून घेता येईल. या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांनी संध्याकाळी सव्वाचार वाजेपर्यंत मंदिराच्या आवारात जमायचे आहे. मंदिर परिसरात वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था नसल्याने उपक्रमात सहभागी होणाऱ्यांनी आपली वाहने स्थानिकांना अडचण होणार नाही याची दक्षता घेऊन योग्य ठिकाणी पार्क करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ संपर्क साधावा.

- कधी : रविवार, १६ एप्रिल
- केव्हा : सायंकाळी साडेचार वाजता
- कोठे : त्रिशुंड गणपती मंदिर, सोमवार पेठ



त्रिशुंड गणपती.

# समजली अजोड शिल्पकलेची गोष्ट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

गणरायाचे शहरातील सर्वांत देखणे आणि शिल्पकलायुक्त मंदिर अशी ख्याती असलेल्या त्रिशुंड गणपती मंदिराच्या हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्रिशुंड गणपती मंदिरातील शेषाशायी विष्णू, श्रीगणेश यंत्र, चंद्र-सूर्य प्रतिमा, मंदिरांवरील राजस्थानी व उत्तर भारतीय प्रभाव जाणून घेताना या गूढरम्य देवस्थानाचे महत्त्व वारसाप्रेमींना उलगडले.

'बीव्हीजी इंडिया लि.', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. प्रा. प्र. के. घाणेकर यांनी त्रिशुंड गणपतीचा इतिहास आणि स्थापत्य शैलीची माहिती सांगितली. त्रिशुंड गणपती मंदिर हे पुण्याचे सांस्कृतिक वैभव असल्याने सांगून घाणेकर यांनी मंदिरावरील शिल्पे विशेषतः हत्ती, मोर, गेंडा, पोपट यांची शिल्पे दाखवून त्यांचे स्थानमाहात्म्य सांगितले. या मंदिरात विशिष्ट ठिकाणीच



सोमवार पेठेतील त्रिशुंड गणपती मंदिरातील हेरिटेज वॉकमध्ये मंदिराची माहिती सांगताना प्रा. प्र. के. घाणेकर.

ही शिल्पे का आहेत, याची माहितीही त्यांनी दिली. गणेशपट्टीचे महत्त्व, मंदिरांमध्ये आढळणारे कासव आणि त्याचे मंदिर स्थापत्यातील महत्त्वही घाणेकर यांनी सांगितले.

हे मंदिर १७५४ ते १७७० या काळात बांधले गेले असावे अशी शक्यता अभ्यासक वर्तवितात. मंदिराच्या बाहेरचा भाग समजावून सांगितल्यावर घाणेकर यांनी येथील शिलालेख वाचून दाखविला. त्याचे मराठीत लिप्यंतर करून त्याचा अर्थही स्पष्ट केला. मंदिराच्या आतील गर्भगृह, शिल्पशैली समजावून सांगितली. प्रदक्षिणामार्गावरील शिल्पे आणि त्यांची वैशिष्ट्ये सांगितली. या मंदिराच्या दारांवर उंबऱ्यापाशी कीर्तीमुखे कोरलेली आहेत. या संदर्भात घाणेकरसरांनी जालिंदरासुराची गोष्ट सांगितली. या मंदिरात वैशिष्ट्यपूर्ण तळघर आहे. त्यात श्री दत्तगुरु गोसावी महाराजांची समाधी आहे. प्रास्ताविक प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी केले. विनयन वाघमारे यांनी आभार मानले. उमेश पोटे यांनी संयोजन केले.

**Trishund Ganapati Mandir**
**16/04/2023**

## डॉ. आंबेडकर स्मारक येथे हेरिटेज वॉक

**पुणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, रविवारी (२३ एप्रिल) सेनापती बापट रस्त्यावरील सिम्बायोसिस संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय आणि स्मारक येथे हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेदहा वाजता हा हेरिटेज वॉक होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे हा उपक्रम होत आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या वेळी बाबासाहेबांच्या व्यक्तीगत वापरातील वस्तू, १९० छायाचित्रे, जवळपास पाचशे पुस्तके, दृकश्राव्य पद्धतीची सहा दालने पाहायला मिळणार आहेत. याव्यतिरिक्त दुर्मीळ छायाचित्रे, भारतरत्न पदक या गोष्टीही हेरिटेज वॉकमध्ये सहभागी होणाऱ्यांना पाहायला मिळणार आहेत. या प्रसंगी देसाई महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश राऊत उपस्थितांना बाबासाहेबांच्या कार्याची माहिती देणार आहेत. वॉकमध्ये सहभागी होणाऱ्यांनी सकाळी सव्वादहा वाजता सिम्बायोसिसच्या आवारात जमायचे आहे.

# ज्ञानसूर्याच्या आठवणींना मिळाला उजाळा

### 'हेरिटेज वॉक'मध्ये डॉ. आंबेडकर संग्रहालयाला भेट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले जीवन अखंड ज्ञानसाधनेत खर्च केले, म्हणून ते ज्ञानसूर्य म्हणून ओळखले गेले,' अशा शब्दांत प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा दिला. बीव्हीजी इंडिया लि., क्लब हेरिटेज, पुणे आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांनी नुकत्याच आयोजित 'हेरिटेज वॉक'मध्ये ते बोलत होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि जीवन समजून घेण्यासाठी



बीव्हीजी इंडिया, क्लब हेरिटेज पुणे आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्यातर्फे आयोजित 'हेरिटेज वॉक'ला उपस्थित पुणेकर.

वारसाप्रेमी पुणेकर सिम्बायोसिस संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालयात जमले होते. रवी घाटे यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी सुगंधी वनस्पती विभागाचे प्रकल्प व्यवस्थापक उदय देशमुख आणि 'युक्रांद'चे संदीप बर्वे यांचा सत्कार करण्यात आला. आंबेडकरी चळवळीतील अभ्यासक युगानंद साळवे आणि माजी प्राचार्य कैलास बवले कार्यक्रमाला उपस्थित होते.

संग्रहालयाच्या उभारणीविषयीचा माहितीपट या वेळी दाखविण्यात आला. 'सिम्बायोसिस'चे प्रमुख डॉ. शां. ब. मुजुमदार आणि संजीवनी मुजुमदार यांच्या परिश्रमांतून हे संग्रहालय कसे आकाराला आले, याची माहिती उपस्थितांनी घेतली. डॉ. माई आंबेडकर यांनी दिलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वस्तू, ग्रंथ यांमुळे हे संग्रहालय आकारास आले. घटना समितीत डॉ. आंबेडकर यांनी केलेले भाषणही या वेळी ऐकवण्यात आले. यानंतर डॉ. राऊत यांनी डॉ. आंबेडकर यांच्या 'बहिष्कृत भारत', 'मूकनायक' आणि 'जनता' या वृत्तपत्रांची माहिती दिली.

**शनिवारी गांधीभवनमध्ये 'वॉक'**

उद्या, शनिवारी (२९ एप्रिल) दुपारी चार वाजता, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, कोथरूड (गांधीभवन) येथे 'हेरिटेज वॉक' आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे सचिव संदीप बर्वे उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. या दिवशी गांधीजींच्या जीवनावरील लघुपट दाखविला जाणार आहे. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीच महाराष्ट्रातील कार्य याविषयी जाणून घेता येईल.

**Dr. B. R. Ambedkar Museum**

**23/04/2023**

# ‘हेरिटेज वॉक’चे आयोजन

गांधीजींचे जीवन, त्यांचे कार्य समजून घेण्यासाठी आज, शनिवारी (२९ एप्रिल) दुपारी चार वाजता, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, कोथरूड (गांधीभवन) येथे ‘हेरिटेज वॉक’ आयोजित करण्यात आला आहे. ‘बीव्हीजी इंडिया लि.’, ‘क्लब हेरिटेज, पुणे’ आणि ‘एच. व्ही. देसाई’ महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांनी या ‘हेरिटेज वॉक’चे आयोजन केले असून, ‘महाराष्ट्र टाइम्स’ या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे सचिव संदीप बर्वे या वेळी उपस्थितांशी संवाद साधतील. गांधीजींच्या जीवनावरील लघुपट दाखवला जाणार आहे.

**Gandhi Bhavan, Kothrud**
**29/04/2023**

# ‘गोखले’मध्ये उद्या हेरिटेज वॉक

**गोपाळ कृष्ण गोखले जयंतीचे औचित्य**



नामदार गोपाळ कृष्ण गोखले



गोखले इन्स्टिट्यूट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शिक्षक, प्राध्यापक, लेखक, संपादक, कार्यकर्ते ते काँग्रेसचे अध्यक्ष असा प्रवास असणारे; तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात भरीव योगदान देणारी व्यक्ती म्हणून नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांना ओळखले जाते. उद्या, मंगळवारी (९ मे) त्यांच्या जन्माला १५७ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त मराठवाडा मित्रमंडळ कॉलेजजवळील (एमएमसीसी) गोखले इन्स्टिट्यूट येथे हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ८.३० ते दहा या वेळात प्रा. डॉ. गणेश राऊत हे ‘गोखले यांचे जीवन व कार्य’ या विषयावर संवाद साधणार आहेत. या हेरिटेज वॉकचे औचित्य साधून गोखले यांच्या कार्यास आदरांजली वाहिली जाणार आहे.

‘बीव्हीजी इंडिया लिमिटेड’, ‘क्लब हेरिटेज’ आणि ‘एच. व्ही. देसाई महाविद्यालया’चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘महाराष्ट्र टाइम्स’ या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. महात्मा गांधी यांचे गुरू म्हणून नामदार गोखले ख्यातकीर्त आहेत. त्यांनी आयुष्यभर सनदशीर मार्गाने लढा दिला. शिक्षक, प्रोफेसर, लेखक, संपादक, कार्यकर्ते ते काँग्रेसचे अध्यक्ष असा त्यांच्या कारकिर्दीचा प्रवास आहे. हेरिटेज वॉकमध्ये त्यांच्या चौफेर कार्याविषयी जाणून घेता येईल.

गोखले इन्स्टिट्यूटमधील ग्रंथालय, सतराव्या शतकातील पुस्तके, संस्थेच्या प्रांगणातील गोखले यांचा बंगला, त्यांच्या वापरातील विविध वस्तू, ज्ञानवृक्ष इत्यादी गोष्टी पाहता येणार आहेत. गोखले इन्स्टिट्यूट ही १९३०मध्ये स्थापन झालेली संस्था अर्थशास्त्र विषयातील जुनी व प्रमुख अशी संशोधन करणारी संस्था आहे. १९९३पासून या संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळाला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. अजित रानडेही उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांनी सकाळी सव्वाआठ वाजेपर्यंत संस्थेच्या प्रवेशद्वारापाशी जमायचे आहे. **संपर्क :** उमेश पोटे (९८६२०९२३३२).

# उलगडले गोखल्यांचे आभाळाएवढे कार्य

म. टा. प्रतिनिधी, पुणे



प्रा. डॉ. गणेश राऊत

‘न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्य आणि महात्मा गांधी यांचे गुरू ही गोपाळ कृष्ण गोखले यांची ओळखच आधुनिक भारताच्या उभारणीतील त्यांचे स्थान अधोरेखित करते. फर्ग्युसन महाविद्यालयात प्रोफेसर आणि आगरकरांच्या ‘सुधारक’ या पत्रात इंग्रजी विभागाचे संपादक म्हणून काम करताना गोखले यांची वैचारिक जडणघडण झाली. ‘सनदशीर मार्गाने लढा’ हा गोखले यांच्या विचारांचा गाभा होता; किंबहुना ‘एतद्देशीय उदारमतवादाचा सर्वोत्कृष्ट नमुना’ हे गोखले यांचे वर्णन यथार्थ आहे.’ अशा शब्दांत ‘नामदार गोपाळ कृष्ण गोखले’ या ग्रंथाच्या मलपृष्ठावरील लेखक अशोक मोडक यांची नोंद प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी वाचून दाखविली आणि गोखले यांच्या कार्याचा आढावा घेतला. निमित्त होते, गोखले यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त गोखले इन्स्टिट्यूट येथे आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे.

‘बीव्हीजी इंडिया लिमिटेड’, ‘क्लब हेरिटेज, पुणे’ आणि ‘एच. व्ही. देसाई महाविद्यालया’चा इतिहास विभाग यांच्यातर्फे आयोजित या उपक्रमाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘महाराष्ट्र टाइम्स’ या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. गोखले इन्स्टिट्यूटच्या प्रांगणातील गोपाळ कृष्ण गोखले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या वॉकचा श्रीगणेशा झाला. कुलगुरू डॉ. अजित रानडे आणि भारत सेवक समाजाचे मिलिंद देशमुख या वेळी उपस्थित होते. प्रा. जयंती काजळे यांनी प्रास्ताविक केले. ‘डॉ. धनंजय गाडगीळ ग्रंथालया’मध्ये ग्रंथपाल नानाजी शेवाळे यांनी इंग्लंडमध्ये इसवी सन १६८० मध्ये प्रसिद्ध झालेला ग्रंथ उपस्थितांना दाखविला. या ग्रंथातील पृष्ठे बटर पेपरने संरक्षित करण्यात आलेली आहेत. शेवाळे यांनी ग्रंथालयाचे महत्त्व सांगितले. यानंतर गोपाळ कृष्ण गोखले यांच्या बंगल्यात जतन करण्यात आलेल्या गोखले यांच्या वापरातील पगडी, काठी, मेज, खुर्च्या, छायाचित्रे या गोष्टी उपस्थितांनी पाहिल्या. संस्थेतील प्रसिद्ध ज्ञानवृक्षाखाली डॉ. राऊत यांनी गोखले यांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांचा उदारमतवाद, काँग्रेसमधील कार्य, ब्रिटनमधील कार्य याचा आढावा घेतला. आकाश गुळाणकर यांनी सूत्रसंचालन केले. रवी घाटे यांनी आभार मानले. सचिन पोटे, वरुण परब, यश जोग आणि विनयन वाघमारे यांनी संयोजन केले.

**Gokhale Institute**

**09/05/2023**

# कमला नेहरू पार्क जाणून घेऊ या

## 'हेरिटेज वॉक'चे उद्या आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे



औषधी वनस्पतींसह विविध प्रकारच्या ३०० प्रकारच्या वृक्षांनी नटलेले कमला नेहरू पार्क पाहण्याची आणि समजून घेण्याची संधी पुणेकरांना उपलब्ध झाली आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते या उद्यानाचे उद्‌घाटन झाले असून, रविवारी (२१ मे) सकाळी आठ वाजता 'हेरिटेज वॉक'मध्ये हे उद्यान पाहता येणार आहे. लेखक श्याम भुर्के या प्रसंगी हेरिटेज वॉकमध्ये प्रमुख वक्ते असणार आहेत.

बीव्हीजी इंडिया लिमिटेड, क्लब हेरिटेज आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. कमला नेहरू पार्कमध्ये सुमारे ३००पेक्षा जास्त झाडे आणि वनस्पती आहेत. यात औषधी वनस्पतींचा प्रामुख्याने समावेश आहे. भारत-पाकिस्तान युद्धातील एक विमान येथे ठेवण्यात आले आहे. सन २००५पासून ज्ञानकोशकार केतकर यांची स्मृती या उद्यानात जागवली जाते. या कामी श्याम भुर्के यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या पुढाकाराने गेली १८ वर्षे हा कार्यक्रम या उद्यानात चालू आहे. याच बागेत पुणे महापालिकेच्या मराठी भाषा संवर्धन समितीच्या सौजन्याने साहित्य कट्टा चालविला जातो. श्याम भुर्के आणि माधुरी सहस्रबुद्धे यांनी या कामी पुढाकार घेतला आहे. याच बागेत पूर्वी फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेचे विद्यार्थी चित्रीकरण करण्यासाठी यायचे. या वेळी ज्ञानकोशकारांच्या जीवनाचा आढावा भुर्के घेणार आहेत. अधिक माहितीसाठी उमेश पोटे (९७६२०९२३३२) यांच्याशी संपर्क साधावा.

# सामाजिक कार्याचे पैलू अन् हास्यरंजन

## हेरिटेज वॉकला उत्स्फूर्त प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे



प्रा. श्याम भुर्के

कमला नेहरू पार्क या १९५२मध्ये स्थापन झालेल्या पार्कमध्ये 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले होते. या वॉकमध्ये ज्ञानकोशकार केतकर ऊर्फ श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा मिळाला. या प्रसंगी हास्याचे विविध प्रकार अनुभवत उपस्थित हास्यरंगात रंगून गेले. प्रा. श्याम भुर्के यांनी विविध हास्य उपक्रम घेतले.



कमला नेहरू पार्क येथे आयोजित हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रमाच्या सुरुवातीला भुर्के यांनी बालक क्रीडांगण, कारंजे, विरंगुळा केंद्र, कवितांची बाग, भारत-पाक युद्धातील विजयी विमानाची प्रतिकृती, जॉगिंग ट्रॅक आणि उद्यानातील झाडांची माहिती दिली. इसवी सन १७५०मध्ये पुण्यात सारसबागेच्या रूपाने पहिली बाग तयार झाली. १९५०मध्ये पुणे शहरात उद्यानव्यवस्थेसाठी स्वतंत्र खाते सुरू झाले. शहरात २०१६पर्यंत १६८ उद्याने होती. आता तो आकडा वाढला आहे. पुण्याचे तत्कालीन महापौर बाबूराव सणस यांच्या कारकिर्दीत पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते कमला नेहरू पार्कचे उद्‌घाटन झाले, ही माहिती भुर्के यांनी दिली. त्यांतर ज्ञानकोशकार केतकर यांचा जीवनपट श्रोत्यांसमोर उभा केला.

'ज्ञानप्रसार आणि ज्ञानार्जन हेच केतकरांचे ध्येय होते. रायपूर, मुंबई, इंग्लंड, अमेरिका, पुणे असा प्रवास केतकर यांनी केला. बारा वर्षे मेहनत घेऊन २३ खंडांचा ज्ञानकोश तयार करणे ही तत्कालीन भारतातील अभूतपूर्व घटना होय. लेख आणि कादंबऱ्या लिहून केतकर यांनी साहित्यसेवा केली. निजामाच्या कालखंडातल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केतकर यांनी हे सगळे कार्य केले,' असेही त्यांनी सांगितले. केतकरांच्या जीवनावरील कवितेचे वाचन भुर्के यांनी उपस्थितांकडून करून घेतले. या प्रसंगी त्यांनी पार्कमधील हास्य क्लबची माहिती दिली. श्रोत्यांकडून हास्याची विविध प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. प्रा. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. रवी घाटे यांनी आभार मानले. उमेश पोटे यांनी संयोजन केले.

**Kamla Nehru Park**

**21/05/2023**

# सावरकर अध्यासनात हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे



स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या कार्याचे अनेकविध पैलू जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. डेक्कन कॉर्नर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्रात रविवारी सकाळी आठ वाजता (२८ मे) हेरिटेज वॉक या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत माजी आमदार व सावरकर साहित्याचे अभ्यासक डॉ. अशोक मोडक यांच्या व्याख्यान होणार आहे.

## हेरिटेज वॉक

'बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे हा हेरिटेज वॉक होत आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' हा या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. डॉ. मोडक हे महाराष्ट्र विधान परिषदेत बारा वर्षे आमदार होते. गुरू घासीदास केंद्रीय विश्वविद्यालय, बिलासपूर, छत्तीसगड येथे कुलाधिपती या पदावर ते कार्यरत आहेत.

मोडक हे मुंबई विद्यापीठातील मध्य युरेशिया अभ्यास केंद्रात सुप्रतिष्ठित प्राध्यापक आहेत. नॅशनल रिसर्च प्रोफेसर म्हणूनही ते ख्यातकीर्त आहेत. 'स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन आणि स्वामीजी', 'लोकमान्य आणि स्वातंत्र्यवीर' अशी पुस्तके त्यांनी लिहीली आहेत. हेरिटेज वॉकच्याच ठिकाणी स्वातंत्र्यवीरांनी विद्यार्थीदशेत असताना विदेशी कपड्यांची होळी केली होती. या व्याख्यानात मोडक सावरकरांच्या कार्याचा आढावा घेणार आहेत. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२० ९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

# सावरकरांनी दिला स्वयंपूर्णतेचा विचार

**अशोक मोडक यांचे मत**

म. टा. प्रतिनिधी, पुणे



अशोक मोडक

'स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केलेली विदेशी कपड्यांची होळी ही प्रतीकात्मक होती. त्यांना विदेशी सत्ता, विदेशी वस्त्रे, विदेशी शब्द नको होते; त्यामुळे पुणे शहरात सावरकरांनी विदेशी कपड्यांच्या होळीचे आयोजन केले होते,' असे मत माजी आमदार अशोक मोडक यांनी रविवारी व्यक्त केले.

'बीव्हीजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून डेक्कन येथील सावरकर अध्यासन केंद्रात हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मोडक यांनी सावरकर यांच्या कार्यकर्तृत्वाबाबत संवाद साधला.

'भारतात जन्मणे भाग्याचे आणि त्यातही महाराष्ट्रात जन्माला येणे महाभाग्य आहे. ही भूमी क्रांतिकारकांची भूमी आहे. विदेशी कपड्यांच्या होळी करताना हिंदुस्थान स्वतःच्या पायावर उभा करावयाचा आहे, हे सावरकरांना सांगायचे होते. आपल्या विचारांमध्ये स्वराज्य हवे यावर त्यांचा भर होता. अंदमान हा भारताचा भविष्यातला जलदुर्ग ठरेल, असे मत सावरकरांनी मांडले होते. आज भारत-चीन संदर्भात अंदमान-निकोबार बेटे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत,' असेही मोडक यांनी सांगितले. 'बीव्हीजी'चे श्रीकांत सरडे आणि रवी घाटे या वेळी उपस्थित होते. पद्मजा कुलकर्णी यांनी याप्रसंगी सावरकरांवर रचलेली गाणी गायली. प्रा. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. प्रतीक घोलप यांनी आभार मानले. उमेश पोटे आणि संजय बाबर यांनी संयोजन केले.



सावरकर अध्यासन येथे आयोजित हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**Svatantryaveer Savarkar Smarak**

**28/05/2023**



महाराष्ट्र टाइम्स

पुणे PLUS

# आघारकर संस्थेत उद्या हेरिटेज वॉक

मर्यादित प्रवेश असल्याने नावनोंदणी आवश्यक

म. टा. प्रतिनिधी, पुणे



महाराष्ट्र टाइम्स

पुणे PLUS

# संशोधनकार्यास उजाळा

'हेरिटेज वॉक'मध्ये मिळाली आघारकर संस्थेची माहिती

हेरिटेज वॉक

Scanned with OKEN Scanner

**Agharkar Research Institute**

**03/09/2023**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS

## महात्मा फुले संग्रहालयात उद्या हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

उद्योग आणि अभियांत्रिकी, भूगर्भशास्त्र आणि खनिजे, हस्तकला आणि कुटिरोद्योग, शेती, वने, वनस्पती विज्ञान, निसर्ग आणि इतिहास, शस्त्रास्त्रे यांसह आधुनिक काळातील तैल व जलरंगातील चित्रे व शिल्पे एकाच ठिकाणी पाहण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे.

उद्या, रविवारी (१० सप्टेंबर) घोले रस्त्यावरील महात्मा फुले वस्तु संग्रहालय येथे हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता हा हेरिटेज वॉक होणार आहे.

'बीजीजी इंडिया लिमिटेड', 'कलव हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या वॉकमध्ये संग्रहालयाच्या अभिरक्षक प्रा. चैताली दाभोळकर या उपस्थितांना संग्रहालयाची माहिती देणार आहेत.

या संग्रहालयाचे नामकरण १९६८मध्ये 'महात्मा फुले वस्तु संग्रहालय' असे करण्यात आले. या संग्रहालयाचा इतिहास १८७५पासून सापडतो. यातील आठ दालने विविध विभागांना समर्पित करण्यात आली आहेत. संग्रहालयास नाममात्र शुल्क आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांनी सकाळी पावणेदहा वाजता संग्रहालयाच्या आवारात जमण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी उमेश घोटे यांच्याशी ९७६२०९२३२१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

Scanned with OKEN Scanner

## दीडशे वर्षांचा ठेवा अन् इतिहासाची उजळणी...

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'महात्मा फुले संग्रहालय ही एक शैक्षणिक संस्था आहे. दुर्मीळ वस्तूंच्या माध्यमातून महाराष्ट्राची कला, इतिहास, संस्कृती, सामाजिक आणि आर्थिक प्रगती यांचे दर्शन घडविणे हेच संस्थेचे मुख्य काम आहे,' अशा शब्दांत महात्मा फुले वस्तु संग्रहालयाच्या अभिरक्षक चैताली दाभोळकर यांनी संग्रहालयाचे महत्त्व सांगितले. या निमित्ताने वारसाप्रेमींना या संग्रहालयाने जपलेला ठेवा आणि सुमारे दीडशे वर्षांच्या इतिहासाची उजळणी करण्याची संधी मिळाली.

'बीजीजी इंडिया लिमिटेड', 'कलव हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या संग्रहालयात 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

या उपक्रमात संग्रहालयातील विविध वस्तू, उद्योग आणि अभियांत्रिकी विभाग, भूगर्भशास्त्र आणि खनिज पदार्थ, हस्तकला आणि कुटीर उद्योग, कृषी विभाग, वन विभाग, प्राकृतिक विभाग, शस्त्रागार, वनस्पतीशास्त्र उद्यान, ग्रंथालय, विविध शैक्षणिक कार्यक्रम यांची माहिती दिली. जमखंडीचे राजे पटवर्धन यांचे सचिव वर्तक यांना महात्मा गांधी यांना दिलेला चरखा या संग्रहालयात आहे. अशा दुर्मीळ वस्तू वारसाप्रेमींना पाहायला मिळाल्या. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी संग्रहालयाचा इतिहास सांगितला.



चैताली दाभोळकर



महात्मा फुले संग्रहालय येथे आयोजित हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### 'मंडईच्या जागेत संग्रहालय सुरू'

'पुणे औद्योगिक वस्तुसंग्रहालयाची कोनशिला एक एप्रिल १८९० रोजी जुन्या तोफखाना मैदानावर उभारण्यात आली. न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, लोकमान्य टिळक, मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचे सहकार्य मिळाले. एक एप्रिल १९३० रोजी सध्याच्या महात्मा फुले मंडईच्या जागेत म्हणजेच त्यावेळच्या 'रे मार्केट'मध्ये हे संग्रहालय सुरू झाले. पुढे कॉमनवेल्थ इमारतीचा काही भागही संग्रहालयासाठी वापरला गेला. १९६४मध्ये सध्या असणाऱ्या जागेवर वस्तुसंग्रहालयाची इमारत उभारण्यात आली आणि १९६८मध्ये महात्मा फुले वस्तु संग्रहालय हे सरकारच्या नियमानुसार अस्तित्वात आले,' अशी माहिती वारसाप्रेमींना या वेळी मिळाली.

'पुणे औद्योगिक वस्तुसंग्रहालय या नावाने हे संग्रहालय स्थापन झाले. न्यायमूर्ती रानडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, भाऊसाहेब नातू, गजेंद्र कोर, केरो लक्ष्मण छत्रे यांनी वाळवेकर वाड्यात 'पूना एक्झिबिशन अँड म्युझियम कमिटी'ने ४२ प्रकारच्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रसंगी अण्णासाहेब पटवर्धन यांनीही दोन कपाटे भरून वस्तू तिथे ठेवल्या. इसवी सन १८७६ ते १८८८ या कालावधीत अशा स्वरूपाची प्रदर्शने पुण्यात झाली. १८८५मध्ये संग्रहालयात १,६५० वस्तू जमा झाल्या, तर पुणे नगरपालिकेने वर्षाला २० पौंड अर्थात, दोनशे रुपये अनुदान दिले. १८८८मध्ये हिराबागेत १,८६० चौरस फुटांच्या जागेत संग्रहालय सुरू झाले. सरकार, संस्थानिक, संस्था यांच्याकडून ८५ हजार रुपयांची देणगी मिळाली. त्यानंतर वस्तुसंग्रहालयाची वास्तू उभी राहिली,' असे डॉ. राऊत यांनी वारसाप्रेमींना सांगितले.

विनयन वाघमारे आणि उमेश घोटे यांनी संयोजन केले.

Scanned with OKEN Scanner

**Mahatma Phule Museum**
**10/09/2023**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । शुक्रवार, १५ सप्टेंबर २०२३

## शिवाजी पुलाची कथा जाणून घेण्याची संधी

फाइल फोटो



पुणे : शहरातील वैशिष्ट्यपूर्ण वास्तूंमध्ये छत्रपती शिवाजी महाराज पूल ओळखला जातो. हा पूल कसा बांधला गेला आणि त्याची वैशिष्ट्ये या गोष्टींची माहिती जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. येत्या रविवारी (१६ सप्टेंबर) या पुलाजवळ हेरिटेज वॉक या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पुलाच्या बांधकामास शंभर वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त सकाळी नऊ वाजता हा हेरिटेज वॉक होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज पुणे' आणि 'एस. पी. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. पुरातत्त्वज्ञ डॉ. सचिन जोशी या वास्तूची माहिती देणार आहेत. पर्यावरण आणि जलअभ्यासक सुनील जोशी आणि प्रा. रेश्मा माने यांची व्याख्यानेही होणार आहेत. सहभागी होणाऱ्यांनी सकाळी पावणेनऊ वाजता शनिवारवाड्याच्या प्रवेशद्वारासमोर जमायचे आहे. अधिक माहितीसाठी उमेश घोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । सोमवार, १८ सप्टेंबर २०२३

# पुलाच्या इतिहासाची उजळणी

## 'हेरिटेज वॉक'मध्ये शतकमहोत्सवी छत्रपती शिवाजी पुलाला भेट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

रावबहादूर गणपतराव महादेव केळकर या पुणेकराने बांधलेला शंभर वर्षे जुना पूल, त्यांना झालेली साथ, ओव्हरसियर ... या मराठी माणसाची मदत आणि पुलाची बदलत गेलेली नावे ऐकताना पुणेकर थक्क झाले. निमित्त होते, छत्रपती शिवाजी महाराज पूल या वास्तूला शंभर वर्षे झाल्यानिमित्त आयोजित 'हेरिटेज वॉक'चे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एस. पी. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. प्रा. डॉ. सचिन जोशी यांनी वारसाप्रेमींना इतिहासाची सफर घडविली.

'इसवी सन १९२०मध्ये पुलाचे बांधकाम सुरू झाले आणि १९२३मध्ये ते पूर्ण झाले. पुलाच्या बांधकामाचे आर्किटेक्ट ... ई. एस. ... हे होते. ... लॉइड हे त्या वेळी मुंबईचे गव्हर्नर होते. त्यांनी पुलाचे उद्घाटन केल्यामुळे या पुलाचे नाव सर जॉर्ज लॉईड पूल ठेवण्यात आले होते. पुलाचे प्रत्यक्ष बांधकाम हे रावबहादूर केळकर यांनी केले होते. पुलाच्या कामामध्ये अभियंता म्हणून के. एस. फरमजी, कार्यकारी अभियंता ए. एल. ..., सहाय्यक अभियंता एच. ई. ... हे होते. पुलाचे ... बांधकाम आणि ... बेसॉल्ट दगड कोणत्या खाणीतून आणला याची माहिती मिळत नाही. पुलाचे बांधकाम तटबंदीप्रमाणे केलेले दिसते. कुंभारवाड्यासमोर एक छोटा पूल हा मोठा पूल होईपर्यंत अस्तित्वात होता. त्यामुळे या नव्याने बांधलेल्या पुलाला स्थानिक लोक 'नवा पूल' म्हणू लागले असावेत. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जवळच असल्यामुळे पुलाचे नाव 'छत्रपती शिवाजी पूल' असे झाले,' अशी माहिती जोशी यांनी दिली. या प्रसंगी केळकर यांचे ... विनीत केळकर उपस्थित होते. ... केळकर यांच्या ... करण्यात आला. केळकर यांनी आपल्या पूर्वजांविषयी माहिती दिली.

प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. आयोजन उमेश घोटे आणि दिशा गुरव यांनी केले.



सचिन जोशी



विनीत केळकर



शनिवारवाड्याच्या प्रांगणातून 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाला सुरुवात झाली. या प्रसंगी उपस्थित असणारे वारसाप्रेमी.

**Shri Chhatrapati Shivaji Bridge**
**16/09/2023**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । बुधवार, २० सप्टेंबर २०२३

# हेरिटेज वॉकचे उद्या आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'देशातील पहिला सार्वजनिक गणपती' अशी ख्याती असलेल्या बुधवार पेठेतील श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती आणि भाऊसाहेब रंगारी भवन या वास्तूचा इतिहास जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, गुरुवारी (२१ सप्टेंबर) भाऊसाहेब रंगारी भवन (संग्रहालय) येथे सकाळी ११ वाजता 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या उपक्रमात आर्किटेक्ट अर्चना देशमुख उपस्थितांशी संवाद साधणार आहेत.



श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती भवन

देशमुख यांनी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती भवन या वास्तूचे जतन आणि संवर्धनाचे काम केले आहे. संवर्धनाच्या कामाचा त्यांना १२ वर्षांचा अनुभव आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान येथे देशमुख यांनी वारसा संवर्धनाची कामे केली आहेत.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती भवनाच्या जतन आणि संवर्धनाच्या उपक्रमात तीन मजली वास्तू, शस्त्रास्त्रे, भुयारी मार्ग, रथ, भाऊ रंगारी यांचे कार्य आदी बाबींवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. या प्रसंगी मंडळाचे उत्सवप्रमुख पुनीत बालन आणि मंडळाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या वॉकमध्ये सहभागी होणाऱ्यांनी सकाळी पावणे अकरा वाजता एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या मागील बाजूस असणाऱ्या मंडळाच्या जागेत जमायचे आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

२ | महाराष्ट्र टाइम्स । पुणे । शनिवार, २३ सप्टेंबर २०२३ | पुणे | पुणे PLUS

# गणेशभक्तांनी जाणला वारसा

## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट येथे 'हेरिटेज वॉक'


म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहरात इसवी सन १८९२मध्ये स्थापन झालेला सार्वजनिक गणपती, लाकडाची पर्यावरणपूरक मूर्ती, तितकाच जुना श्री गणेशरथ यांची गोष्ट आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवनाचा कायापालट आणि तेथील संग्रहालय, क्रांतिकार्याशी असणारा संबंध हे सगळे ऐकताना वारसाप्रेमी थक्क झाले. निमित्त होते, बुधवार पेठेतील श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट व संग्रहालय येथे आयोजित हेरिटेज वॉकचे.



'हेरिटेज वॉक' या उपक्रमात सहभागी झालेले वारसाप्रेमी.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' हा या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आणि संग्रहालय पुणे येथे हेरिटेज वॉक आयोजित करण्यात आला होता. या वॉकमध्ये आर्किटेक्ट अर्चना देशमुख यांनी भाऊसाहेब रंगारी भवनाचा कायापालट कसा झाला, याची माहिती दिली. या भवनाचे जतन-संवर्धन व पुनर्रचना करताना वाड्याची वारसा वैशिष्ट्ये कशी जपली गेली, याची माहिती सांगून, देशमुख यांनी वाड्याचा मूळ आराखडा आणि नवा आराखडा नकाशासह स्पष्ट केला. भवनातील गुप्त दालन, भुयारी रस्ता, ब्रिटिशकालीन ऐतिहासिक शस्त्रास्त्रे, ईस्ट इंडिया कंपनीची लोखंडी पेटी, वाड्यात असणारी सेंट्रल लॉकिंग सिस्टीम, वाड्यात वापरलेली फ्रेंच काच, रथ बाहेर नेण्यासाठी केलेली योजना या सगळ्याची सविस्तर माहितीही त्यांनी दिली.



पुनीत बालन



अर्चना देशमुख

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांचे चौथ्या पिढीचे वंशज आणि मंडळाचे विश्वस्त संजीव जावळे यांनी भाऊसाहेबांचे योगदान सांगितले. भाऊसाहेबांनी गणेशोत्सवासंदर्भात या ठिकाणी घेतलेली पहिली बैठक आणि त्याचा लोकमान्य टिळकांनी 'केसरी' वर्तमानपत्रात छापलेला ऐतिहासिक वृत्तांत याची माहितीही त्यांनी दिली. ख्यातनाम वक्ते प्रा. श्याम भुर्के यांनी जुन्या गणेशोत्सवाच्या आठवणी उपस्थितांना सांगितल्या. या प्रसंगी मंडळाचे विश्वस्त आणि उत्सवप्रमुख पुनीत बालन यांनी मंदिराचा कायापालट कसा झाला याची थोडक्यात माहिती दिली. 'बीव्हीजी'चे रवी घाटे यांच्या हस्ते बालन यांचा सत्कार करण्यात आला. नीरव सुरतवाला यांच्या हस्ते मंडळाचे विश्वस्त संजीव जावळे आणि आर्किटेक्ट अर्चना देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. आयोजन उमेश पोटे यांनी केले. सानिया सुर्वे हिने पाहुण्यांची ओळख करून दिली. विनयन वाघमारे आणि दिशा गुरव यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with OKEN Scanner

**Shrimant Bhausaheb Rangari Ganapati Bhavan**
**21/09/2023**

महाराष्ट्र टाइम्स
# पुणे PLUS
पुणे । शनिवार, ३० सप्टेंबर २०२३

## आगाखान पॅलेसमध्ये उद्या हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अनेक ऐतिहासिक घडामोडींचे साक्षीदार, महात्मा व कस्तुरबा गांधी यांचे वास्तव्य झालेल्या पुणे-नगर रस्त्यावरील आगाखान पॅलेस या वास्तुला भेट देऊन माहिती जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, रविवारी (एक ऑक्टोबर) सकाळी १० वाजता 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


आगाखान पॅलेस

दोन ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालय' यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या वॉकमध्ये गेली तीन दशके आगाखान पॅलेस येथे गाइड म्हणून मार्गदर्शन करणाऱ्या नीलम महाजन या उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रिन्स आगाखान तिसरे, महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, महात्मा गांधीजींचे मानसपुत्र महादेवभाई देसाई यांच्या कार्याची माहिती या प्रसंगी देण्यात येणार आहे. गांधीजींच्या दैनंदिन वापरातील वस्तू, कृष्णधवल छायाचित्रे, कस्तुरबा गांधी आणि महादेवभाई देसाई यांच्या समाधीची माहितीही जाणून घेता येणार आहे. पॅलेस पाहण्यासाठी शुल्क आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.



## आगाखान पॅलेसची नव्याने ओळख

### 'हेरिटेज वॉक'ला वारसाप्रेमींचा प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे



नीलम महाजन

आगाखान पॅलेस येथील 'हेरिटेज वॉक' या उपक्रमात सहभागी झालेले वारसाप्रेमी.

'सर सुलतान महंमदशाह आगाखान, तिसरे यांनी आगाखान पॅलेस बांधला. तो कस्तुरबा गांधीजी यांच्या पंचविसाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने देशास अर्पण करण्यात आला. 'छोडो भारत आंदोलन' सुरू झाल्यावर ब्रिटिश सरकारने महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, महादेवभाई देसाई, प्यारेलाल, गांधीजींच्या शिष्या मीराबेन, गांधीजींचे वैद्यकीय सल्लागार डॉ. एम. डी. डी. गिल्डर यांना या पॅलेसमध्ये स्थानबद्ध करून ठेवले होते. कस्तुरबा गांधी आणि महादेवभाई देसाई यांनी याच वास्तूत अखेरचा श्वास घेतला.' पुणे-नगर रस्त्यावरील आगाखान पॅलेस या वास्तूशी जडलेल्या अशा अनेक ज्ञात-अज्ञात पैलूंची माहिती वारसाप्रेमींनी जाणून घेतली. निमित्त होते, आगाखान पॅलेस येथे रविवारी आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. गेली ३० हून अधिक वर्षे वारसाप्रेमींना या वास्तूच्या अंतरंगांची ओळख करून देणाऱ्या येथील गाइड नीलम महाजन यांनी उपस्थितांशी संवाद साधला. गांधीजी, कस्तुरबा आणि महादेवभाई यांच्या वापरातील वस्तूही उपस्थितांना दाखविण्यात आल्या. या प्रसंगी चार्टर्ड अकौंटंट किरण कणानी आणि 'पुना गुजराती केळवणी मंडळा'चे सहसचिव दिलीप जगड यांनीही संवाद साधला. उद्योजक राजकुमार दुरगुडे पाटील यांनी मराठवाडा स्वातंत्र्यसंग्रामाची माहिती दिली. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी प्रास्ताविकात महात्मा गांधीजींविषयीच्या गोष्टी सांगितल्या. विनय वाघमारे आणि दिशा गुरव यांनी सूत्रसंचालन केले. उमेश पोटे यांनी आयोजन केले.

Scanned with OKEN Scanner

**Agakhan Palace**
**01/10/2023**

# महाराष्ट्र टाइम्स पुणे PLUS

पुणे । शुक्रवार, ६ ऑक्टोबर २०२३

## सारसबागेचा इतिहास जाणून घेण्याची संधी

पुणे : शहराच्या मध्यवर्ती भागातील सारसबागेबाबतच्या इतिहासाबाबत नागरिकांना कायमच कुतूहल असते. सारसबागेची इतिहास, माहिती जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, शनिवारी (सात ऑक्टोबर) सारसबाग येथे 'हेरिटेज वॉक'चे आयोजन केले असून, इतिहास अभ्यासक मंदार लवाटे सविस्तर माहिती देणार आहे.

बीव्हीजी इंडिया लिमिटेड, क्लब हेरिटेज आणि एस. पी. देसाई महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने शनिवारी (७ ऑक्टोबर) सायंकाळी पाच वाजता हेरिटेज वॉकचे आयोजन केले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत पर्वतीच्या पायथ्याशी सन १७५० साली आंबिल ओढ्याच्या सीमेवर एका कृत्रिम तलावाचे काम हाती घेतले होते. सुमारे २५ एकरावर असणाऱ्या तलावात सारस पक्षीही सोडले होते. त्यानंतर बेटावर बाग तयार झाल्याचा इतिहास आहे. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनी या बागेला 'सारसबाग' असे नाव दिले. सारसबागेची माहिती वॉकच्या निमित्ताने पुणेकरांना समजणार आहे. अधिक माहितीसाठी उमेश घोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# महाराष्ट्र टाइम्स पुणे PLUS

पुणे । मंगळवार, १० ऑक्टोबर २०२३

## उलगडला सारसबागेचा रंजक इतिहास

### 'हेरिटेज वॉक'मध्ये वारसाप्रेमींचा सहभाग

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पेशवाईत रामचंद्र गणेश कानडे यांच्याकडे जरीपटक्याचा मान होता. मात्र, हा जरीपटका कसा असतो आणि त्याचे ऐतिहासिक संदर्भ याची माहिती जाणून घेण्यासाठीची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, सारसबाग येथे शनिवारी आयोजित 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे. सारसबागेतील सिद्धीविनायक मंदिराच्या उभारणीची रंजक गोष्टही उपस्थितांनी या वेळी जाणून घेतली.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एस. पी. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' हा या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. शहर आणि वारसा अभ्यासक मंदार लवाटे यांनी वारसाप्रेमींना इतिहासाची सफर घडवली. सुरुवातीला मंदिरावर फडकणारा जरीपटका, तो कसा तयार केला जातो याबद्दल लवाटे यांनी प्रात्यक्षिकासह माहिती दिली. त्यानंतर सारसबागेसंदर्भात इसवी सन १७८४ पर्यंतच्या घडामोडी त्यांनी उपस्थितांना सांगितल्या.



सारसबाग येथे आयोजित 'हेरिटेज वॉक' उपक्रमाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'सारसबागेचे तळे आंबिल ओढ्याला बांधलेल्या भिंतीमुळेच निर्माण झाले. १७८४मध्ये येथील मंदिरात सिद्धीविनायकाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. १७८२मध्येच हे मंदिर बांधायचे ठरल्याची नोंद पुणे पुराभिलेखागारात मिळते. पूजा करण्यासाठी, नैवेद्याचा स्वयंपाक करण्यासाठी दोन माणसे आणि त्यांना मदत करण्यासाठी एक खटपट्या अशा पदावरील व्यक्ती अशा तीन लोकांची नेमणूक गणपतीसाठी करण्यात आली. गणपतीच्या मूर्तीसाठी त्या काळात पोशाखही शिवले जात होते. १८८२मध्ये मूर्ती बदलण्यात आली. १७८४ ते १८८२ पहिली मूर्ती, १८८२मधील दुसरी मूर्ती १९९०मध्ये बदलण्यात आली. आता १९९०मध्ये स्थापन केलेली मूर्ती पाहायला मिळते. सध्याचे मंदिर १९७७मध्ये बांधलेले आहे. इसवी सन १८५०मध्ये देवदेवेश्वर संस्थान सार्वजनिक विश्वस्त निधी म्हणून नोंदले गेले आहे. १८६१मध्ये मुंबई सरकारने तलावामधील बेट सोडून इतर जागा पुणे नगरपालिकेच्या ताब्यात दिली,' अशी माहिती लवाटे यांनी दिली.

प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. उमेश घोटे, तरुण पारख, दिशा गुप्ता आणि विनयन कासमारे यांनी आयोजन केले.

### असा लागला जरीपटक्याचा शोध



मंदार लवाटे

'दोनशे वर्षांपूर्वी शनिवारवाड्यासमोर सरदार कानडे यांचा वाडा होता. दर दसऱ्याला जुना जरीपटका बदलून नवा जरीपटका लावण्याचे काम सरदार कानडे यांच्याकडे होते. पुढे ते संभाजीनगर येथे गेल्यामुळे परिस्थिती बदलली. कानडे यांचे वंशज अंबादास कानडे यांनी ही माहिती संस्थानचे सध्याचे मुख्य पंच रमेश भागवत यांना दिल्यावर भागवत यांनी जरीपटका तयार करून घेतला. उदयसिंह पेशवा यांच्या हस्ते त्याची पूजा करून तो मंदिरावर बसवला. अशा रीतीने जरीपटक्याचा शोध लागला,' असेही लवाटे यांनी स्पष्ट केले.

**Sarasbaug**

**07/10/2023**

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । शनिवार, १४ ऑक्टोबर २०२३ ५

# 'कसबा' गणपतीचा जाणून घ्या इतिहास

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुण्यनगरीच्या स्थित्यंतराचा साक्षीदार आणि प्रत्येक कार्याची अक्षता ज्याला वाहिली जाते, अशा ग्रामदैवत कसबा उर्फ जयती गजाननाचा इतिहास जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. येत्या सोमवारी (१६ ऑक्टोबर) कसबा गणपती मंदिर येथे 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी दहा वाजता हा हेरिटेज वॉक होणार आहे. तत्पूर्वी शनिवारवाड्याजवळील एच. व्ही. देसाई महाविद्यालयात गणपती उपासनेच्या इतिहासाबाबतचा 'स्लाइड शो' होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज, पुणे' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या उपक्रमात 'भारतीय विद्या' या विषयाचे अभ्यासक प्रा. चैतन्य साठे उपस्थितांना कसबा गणेशाची माहिती देणार आहेत. कसबा गणपती हा पुण्याचा मानबिंदू


कसबा गणपती

आहे. मध्ययुगातील एका ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार म्हणजे कसबा गणपती देवस्थान. मातुश्री जिजाऊसाहेब आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे श्रद्धास्थान असणाऱ्या या ठिकाणाचा जीर्णोद्धार नव्या पुण्याची रचना करताना झाला. खऱ्या अर्थाने तो स्वराज्याचा श्रीगणेशा ठरला. या देवस्थानाची माहिती या वॉकमध्ये जाणून घेता येईल. यासह 'भारतीय उपखंडातील गणपती उपासनेचा सांस्कृतिक इतिहास' या विषयावरील सादरीकरणही एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या शांताबेन सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. हा 'स्लाइड शो' संपल्यानंतर इच्छुकांनी कसबा गणपती येथे जमायचे आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे (९७६२०९२३३२) यांच्याशी संपर्क साधावा.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । शुक्रवार, २० ऑक्टोबर २०२३ ७

# गणेश उपासनेचा उदय सांगणारा 'वॉक'


प्रा. चैतन्य साठे

**पुणे :** भारतीय उपखंडातील गणेश उपासनेचा उदय आणि प्रसार दृक-श्राव्य पद्धतीने अनुभवताना श्रोते आश्चर्यचकित झाले. प्रा. चैतन्य साठे यांनी हेरिटेज वॉकमध्ये 'गणेश उपासना' या विषयावर श्रोत्यांशी संवाद साधला आणि कसबा गणपतीची प्रदक्षिणा घडवून आणली.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचा' इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कसबा गणपती इथल्या हेरिटेज वॉकमध्ये साठे बोलत होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

कार्यक्रमाचा पूर्वार्ध एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या शांताबेन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. पूर्वार्धात गणपती या देवतेच्या संदर्भातील स्लाइड शो दाखविण्यात आला. यात भारत, अफगाणिस्तान, थायलंड, कंबोडिया, जावा-सुमात्रा आदी ठिकाणी गणपतीचा प्रवास कसा झाला हे प्रा. साठे यांनी समजावून सांगितले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव यांनी प्रास्ताविक केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. गणेश राऊत यांनी कार्यक्रमामागची भूमिका विशद केली. सानिया सुर्वे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. 'पूना गुजराती केळवणी मंडळा'चे किरण कनाणी या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कसबा गणपती येथील मंदिरात प्रा. साठे यांनी मंदिराचा शिवकालीन इतिहास सांगितला. मंदिराच्या इतिहासाची पार्श्वभूमी सांगून मंदिराच्या स्थापत्याचा त्यांनी धावता आढावा घेतला. गर्भगृह, ओसरी, गणेशपट्टी, व्यासस्थान, मंदिरातील शिल्पकला, लाकडी काम; तसेच भुलेश्वर इथल्या वैनायकी गणपतीची माहितीही त्यांनी दिली. डाव्या व उजव्या सोंडेचा गणपती यातील फरक त्यांनी सांगितला. शेवटी श्रोत्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन उमेश पोटे यांनी केले होते. विनयन वाघमारे आणि दिशा गुरव यांनी सूत्रसंचालन केले, तर निखिल शिंदे यांनी आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

**Shri Kasba Ganapati Mandir**
**16/10/2023**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । रविवार, २२ ऑक्टोबर २०२३

# 'शिवसृष्टी'त आज 'हेरिटेज वॉक'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शिवचरित्राची ओळख वेगळ्या पद्धतीने सांगणाऱ्या आंबेगाव येथील शिवसृष्टी येथे आज, रविवारी (२२ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता 'हेरिटेज वॉक' घेण्यात येणार आहे.

'महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान'च्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे. 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

या हेरिटेज वॉकमध्ये शिवछत्रपतींच्या काळात वापरात असलेल्या शस्त्रांचे दालन दाखवण्यात येणार आहे. यात तलवार, भाला, चिलखत, दांडपट्टा, वाघनखे, कट्यार, तोफ, बंदूक, बाण पाहायला मिळणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शत्रू असणाऱ्या बादशहा आणि सरदारांची ऐतिहासिक चित्रे पाहायला मिळणार आहेत. राज्याभिषेक सोहळा, आग्रा येथून सुटका, रायगड सफर, किल्ल्यांच्या प्रतिकृती सहभागींना बघायला मिळणार आहेत. मुख्य आकर्षण म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराज जणू आपल्याशी संवाद साधत आहेत, असाही भास येथे एका दालनात करण्यात आलेला आहे.

या हेरिटेज वॉकमध्ये शिवअभ्यासक डॉ. अजित आपटे, प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी मा. अनिल पवार आणि प्रा. डॉ. गणेश राऊत उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमासाठी नेहमी २५० रुपये शुल्क असते. प्रतिष्ठानने या कार्यक्रमासाठी प्रत्येकी १०० रुपये सवलत दिली आहे. यामुळे प्रत्येकी १५० रुपये तिकीट असेल. दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ८० रुपये तिकीट आहे. अधिक माहितीसाठी उमेश पेटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा 'महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान', शिवसृष्टी, सर्वे क्र. १३, आंबेगाव (बु.), कात्रज, बाह्यवळण रस्ता, ता. हवेली, जि. पुणे - ४६ यांच्याशी ९५७९६२२४५६ / ७८२०९२३७३० या क्रमांकावर संपर्क साधावा.

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । मंगळवार, २४ ऑक्टोबर २०२३

# उलगडले शिवसृष्टीचे मर्म

## 'हेरिटेज वॉक'मध्ये वारसाप्रेमींनी घेतली शिवकालीन शस्त्रांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे




"मध्ययुगातील सतराव्या शतकाची कथा येथे आपणास एकविसाव्या शतकातील सुविधांच्या माध्यमातून पाहता आणि ऐकता येते. जाणता राजा या महानाट्याच्या प्रयोगातील नफा बाजूला ठेवून सरकार वाड्याची अर्थात शिवसृष्टीची उभारणी सुरू झाली. २१ एकर जागेत शिवसृष्टी उभारली जाणार आहे. आतापर्यंत १५ टक्के काम पूर्ण झाले आहे. एकूण साडेचारशे कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे एकूण चार टप्पे असून, आतापर्यंत एकच टप्पा पूर्ण झाला आहे.

\- अजित आपटे, इतिहास अभ्यासक

'महाराजांच्या अल्पायुषी कालखंडात काम करणाऱ्या कलाकारांनी आपल्या नायकाचे कायमस्वरूपी स्मारक उभारलेली जगाच्या इतिहासातील एकमेव वास्तू म्हणजे शिवसृष्टी होय,' अशा शब्दांत इतिहास अभ्यासक अजित आपटे यांनी शिवसृष्टीचे मर्म उलगडून सांगितले. निमित्त होते शिवसृष्टी, आंबेगाव येथील 'हेरिटेज वॉक'चे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड, क्लब हेरिटेज आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'हेरिटेज वॉक'मध्ये ते बोलत होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

या प्रसंगी 'हेरिटेज वॉक'मध्ये सहभागी झालेल्यांनी शिवकालीन शस्त्रास्त्रे, त्यांच्या प्रतिकृती, वाघनखे, ढाल, तलवार, भाले, दांडपट्टा यांसारखी शस्त्र पाहिली. शिवराज्याभिषेक समयी उपस्थित असणाऱ्या इंग्रज वकील हेनरी ऑक्झिंडेनचे मूळ छायाचित्रावरून तयार केलेले चित्र पाहायला मिळाले. या प्रसंगी अनिता जाधव यांनी 'दुर्ग वैभव' या दालनाची माहिती देऊन महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांची ऐतिहासिक माहिती दिली. निकिता महागडे आणि अल्पेश गुरव यांनी 'रणांगण' आणि 'सिंहासनाधीश्वर' या दालनातील माहिती दिली. अजय जाधव, रोहित गटे आणि संकेत भोसले यांनी 'श्रीमंत योगी' आणि 'आग्रा येथून सुटका' या दालनात माहिती दिली. प्रतीक्षा पवार आणि अंकुश कदम यांनी तिकीट सवलती संदर्भात मदत केली. 'हेरिटेज वॉक'ला सरकार वाड्याचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी अनिल पवार, व्यवस्थापक अक्षय अडसूळ यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संयोजन उमेश पेटे यांनी केले. वरुण परब यांनी आभार मानले.

**Shivsrushti**

**22/10/2023**

महाराष्ट्र टाइम्स
# पुणे PLUS
पुणे । शुक्रवार, २७ ऑक्टोबर २०२३

## ओंकारेश्वर मंदिरात आज हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने येत्या शनिवारी (२८ ऑक्टोबर) सकाळी अकरा वाजता पेशवाईतील एक महत्त्वाचे मंदिर असणाऱ्या ओंकारेश्वर मंदिर येथे हेरिटेज वॉक आयोजित करण्यात आला आहे. पुणे शहराचे अभ्यासक मंदार लवाटे या मंदिराची माहिती देणार आहेत.

बीव्हीजी इंडिया लिमिटेड, क्लब हेरिटेज आणि एस. पी. देसाई महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

शहर पुणे, खंड एकनुसार ओंकारेश्वर मंदिराची उभारणी १७६० मध्ये झाली. ओंकारेश्वर मंदिराची रचना खूपच निराळी आहे. एका मोठ्या लांबचौकोनी जागेभोवती भिंती व कमानींच्या ओळ्या. पूर्वेकडील बाजूला मोठे प्रवेशद्वार व त्यावर छोटा नगारखाना आणि पश्चिमेच्या बाजूला नऊ पाखांचे एक विस्तृत दालन, याच्या मधल्या पाखेत भगवान शंकरांची पिंड आहे. या मंदिराचे शिखर बांधकामही वेगळे आहे. शिखरामध्ये असणारी एक वेगळी खोली, शिखराच्या आजूबाजूचा परिसर लक्षवेधी आहे. मोडी लिपीचे जाणकार पुणे शहराचे अभ्यासक आणि ख्यातनाम संशोधक मंदार लवाटे या प्रसंगी श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. मध्ययुगातील पुण्यातील मंदिरे, या मंदिरांशी संबंधित असणारी भोंडातील कागदपत्रे, पेशवाईतील बांधकामाची वैशिष्ट्ये, हेमाडपंती मंदिरे, ओंकारेश्वराचे महत्त्व, दीपमाळ, ओंकारेश्वर मंदिराचा परिसर अशा विविध गोष्टींवर ते प्रकाश टाकणार आहेत. अधिक माहितीसाठी उमेश पोटे ९७६२०९२३३२ यांच्याशी संपर्क साधावा.

महाराष्ट्र टाइम्स
# पुणे PLUS
पुणे । गुरुवार, २ नोव्हेंबर २०२३



ओंकारेश्वर मंदिर येथे आयोजित हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## उलगडला ओंकारेश्वराचा इतिहास

म. टा. प्रतिनिधी, पुणे



मंदार लवाटे

पुण्यातील वैशिष्ट्यपूर्ण आणि भव्य शिवालय म्हणून नदीपात्रातील ओंकारेश्वराचे मंदिर परिचित आहे. या मंदिराच्या बांधणीपासून त्याच्या वैशिष्ट्यांची माहिती जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, मंदिरात आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एस. पी. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. शहर व वारसा अभ्यासक मंदार लवाटे यांनी ओंकारेश्वराची परिपूर्ण माहिती देताना उपस्थितांना मध्ययुग ते आधुनिक युगाची सफर घडवली.

ओंकारेश्वर मंदिराच्या कामाचा मुहूर्त २६ ऑक्टोबर १७३६ रोजी झाल्याचे सांगून लवाटे म्हणाले, 'या ठिकाणाहून म्हणे पाणी पिण्यासाठी नदीमध्ये उतरत. घाटाजवळची जागा नव्या शिवमंदिरासाठी निश्चित करण्यात आली. मंदिराचा सर्व खर्च पेशव्यांनी केला. हे मंदिर भव्य असून, अंतर्गत प्रदक्षिणा मार्ग असलेले शिवमंदिर फारसे पाहायला मिळत नाही. येथील शिवलिंगही मोठे व प्रमाणबद्ध आहे. शिवलिंगामधील उभा भाग, म्हणजे 'बाण' नर्मदा नदीतून आणला आहे. तो 'उत्तम घोरलक्षणयुक्त' असल्याचे या संदर्भातील पेशवे दफ्तरातील नोंदीत म्हटले आहे. त्या काळात बाण आणणाऱ्यास पाच-सातशे रुपये दिले, असेही या नोंदीत म्हटले आहे. त्या वेळी सोने १५ रुपये तोळा होते. बाणास अनुसरून 'शाळुंका' म्हणजे शिवलिंगाचा जमिनीवरील समांतर भाग पुण्यातच तयार करण्यात आला. शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा आषाढ शुद्ध त्रयोदशी १८ जून १७३८ रोजी करण्यात आली.'

'पानशेतच्या पुरामुळे शहराचे नुकसान झाले. पुरात मंदिर पाण्याखाली गेले होते. ते चांगल्या अवस्थेत आणण्यासाठी मंदिराचे कार्यकारी विश्वस्त घनश्याम लोणकर आणि सहकाऱ्यांनी प्रयत्न केले. प्रदीर्घकाळ या मंदिराजवळ पुण्याचे स्मशान होते. मात्र, १९७१मध्ये पुण्यात वैकुंठ स्मशानभूमी तयार झाली आणि तो प्रश्न सुटला. भक्तांचे मंदिर फुलू लागले,' असेही लवाटे यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. मनीषा राऊत यांनी प्रास्ताविक केले. उमेश पोटे यांच्यासह दिशा गुप्ता, निखिल शिंदे आणि वरुण परब यांनी संयोजन केले.

**Shri Omkareshwar Mandir**
**28/10/2023**

# नगर वाचन मंदिरात उद्या हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे


संग्रहित छायाचित्र

दुर्मीळ ग्रंथांचा खजिना आणि १७५ वर्षे जुनी परंपरा असणारे ग्रंथालय, अशी ख्याती असणाऱ्या बुधवार पेठेतील पुणे नगर वाचन मंदिर या ग्रंथालयाला भेट देण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, शनिवारी (चार नोव्हेंबर) सकाळी साडेनऊ वाजता या ग्रंथालयात हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. बेंगळुरू येथील 'सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी' या संस्थेचे सुबोध कुलकर्णी 'ग्रंथालय आणि मुक्तज्ञान निर्मिती' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. पुणे नगर वाचन मंदिराचे सहकार्यवाह प्रा. डॉ. प्रसाद जोशी ग्रंथालय, ग्रंथालयाचे स्थलांतर, ग्रंथालयातील दुर्मीळ ग्रंथ याची माहिती देणार आहेत.

हेरिटेज वॉकमध्ये ग्रंथालयातील दीडशे वर्षांपूर्वीची पुस्तके, ग्रंथालय, ग्रंथालयातील जुन्या तसबिरी पाहता येतील; तसेच ग्रंथालय फिरून पाहता येईल. उपक्रमात सहभागी होणाऱ्यांनी सकाळी सव्वानऊ वाजता या ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारापाशी जमायचे आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । बुधवार, ८ नोव्हेंबर २०२३

# वारसाप्रेमींनी जाणली दुर्मीळ ग्रंथपरंपरेची महती

हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे


पुणे नगर वाचन मंदिर येथे आयोजित 'हेरिटेज वॉक'ला वारसाप्रेमींचा प्रतिसाद मिळाला.


प्रा. प्रसाद जोशी


मधुमिलिंद मेहेंदळे


सुबोध कुळकर्णी

पुणे नगर वाचन मंदिराच्या १७५ वर्षांच्या इतिहासाची सफर वारसाप्रेमींना घडली. निमित्त होते, बुधवार पेठेतील पुणे नगर वाचन मंदिर येथे आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे. या वॉकमध्ये २२० वर्षांपूर्वीची पोथी आणि दुर्मीळ ग्रंथ हाताळण्याची संधीही उपस्थितांना मिळाली.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'च्या इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. प्रा. प्रसाद जोशी यांनी ग्रंथालयाची १८४८ ते २०२३ अशी वाटचाल उपस्थितांना सांगितली. मूळची दुमजली इमारत, हल्लीची तीन मजली इमारत, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे संस्थापक म्हणून कार्य, पहिले अध्यक्ष न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे कार्य यावर जोशी यांनी आपल्या भाषणात प्रकाश टाकला. 'देशाळ्यांच्या बुधवार वाड्यात ही संस्था स्थापन झाली आणि वाढली. पुढे या वाड्याला आग लागली आणि वाड्याचे स्थलांतर करावे लागले. द पूना नेटिव्ह जनरल लायब्ररी ते पुणे नगर वाचन मंदिर असा हा प्रवास आहे,' असे जोशी यांनी सांगितले.

बेंगळुरू येथील 'सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी'चे सुबोध कुळकर्णी यांनी भविष्यकाळाचा वेध घेऊन डिजिटल लायब्ररीची सफर श्रोत्यांना इंटरनेटच्या माध्यमातून घडवून आणली. त्यांनी दृकश्राव्य पद्धतीने ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन, जुने साहित्य कसे जतन करता येईल याचे प्रात्यक्षिक दाखविले आणि श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे यांनी संस्थेच्या विस्तार कार्यक्रमाची माहिती दिली. आतापर्यंत संस्थेला भेट देणारे नामवंत, संस्थेतर्फे प्रकाशित केलेले दिवाळी अंक यांची माहिती दिली. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी ग्रंथालयाचे महत्त्व, ग्रंथालयातील तैलचित्रांच्या संबंधीची माहिती दिली. उमेश पोटे यांच्यासह वरुण परब, दिशा गुरव आणि विनय वाघमारे यांनी संयोजन केले.

**Pune Nagar Vachan Mandir**
**04/11/2023**



महाराष्ट्र टाइम्स

पुणे PLUS

# हेरिटेज वॉकमध्ये सफर 'कृष्णधवल' पुण्याची

म. टा. प्रतिनिधी, पुणे



महाराष्ट्र टाइम्स

पुणे PLUS

# आठवणींतून दिसले कृष्णधवल पुणे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

मंदार लवाटे

राजेशभाई शहा

**H. V. Desai College of Arts, Science and Commerce**

**11/11/2023**

महाराष्ट्र टाइम्स
# पुणे PLUS
पुणे । शनिवार, १८ नोव्हेंबर २०२३

## राज्याभिषेक सोहळ्यावर रविवारी व्याख्यान

पुणे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला यंदा साडेतीनशे वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त हेरिटेज वॉक उपक्रमात 'श्री शिवराज्याभिषेक' या विषयावर व्याख्यान आणि दृकश्राव्य सोहळा अनुभवण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, रविवारी (१९ नोव्हेंबर) सकाळी साडेनऊ वाजता नवीन मराठी शाळेत हा कार्यक्रम होईल.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'कलव हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे आयोजित या उपक्रमाचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर आहे. इतिहासप्रेमी मंडळाचे प्रमुख प्रा. मोहन शेटे राज्याभिषेक सोहळ्याची माहिती देणार आहेत. या व्याख्यानानंतर सशुल्क दृकश्राव्य कार्यक्रम होईल. अधिक माहितीसाठी उमेश घोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ संपर्क साधावा.

महाराष्ट्र टाइम्स
# पुणे PLUS
पुणे । बुधवार, २२ नोव्हेंबर २०२३



'श्री शिवराज्याभिषेक' या विषयावर आयोजित व्याख्यान आणि दृकश्राव्य सादरीकरणाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## इतिहासाला शाळेत अभिवादन

**शिवराज्याभिषेकाचे महत्त्व नवीन मराठी शाळेत कथन**

म. टा. प्रतिनिधी, पुणे



मोहन शेटे

'स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया शिवराज्याभिषेकापासून सुरू झाली. सर्वमान्य रयतेचे राज्य या संकल्पनेत शिवराज्याभिषेकाचे महत्त्व सामावलेले आहे,' असे मत इतिहासाचे अभ्यासक मोहन शेटे यांनी हेरिटेज वॉक या उपक्रमात व्यक्त केले.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'कलव हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे नवीन मराठी शाळेत 'श्री शिवराज्याभिषेक' या विषयावर शेटे यांचे व्याख्यान आणि दृकश्राव्य कार्यक्रम झाला. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

या उपक्रमात 'इतिहास प्रेमी मंडळा'ने साकारलेली शिवराज्याभिषेकाची प्रतिकृती वारसाप्रेमींना पाहता आली. 'मध्ययुगाच्या कालखंडात भूमिपुत्रांच्या हाती सत्ता असली पाहिजे, असा विचार शिवकालीनांनी केला. या सत्तेला अर्थातच स्वराज्याला अधिकृत मान्यता राज्याभिषेकानेच मिळणार होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून महाराजांनी स्वराज्यनिर्मिती महाराजांनी घडवून आणली. याच जोडीला शिवराज्याभिषेक झाल्याने सिंहासनाधिष्ठित राजसत्ता ही संस्था कायमची झाली. व्यक्ती येतात आणि जातात, संस्था मात्र कायम असतात, हा विचार महाराष्ट्राला रुजला. त्याचा उपयोग इसवी सन १६८० ते १७०७ या कालखंडात दिसला. महाराष्ट्रात २५ वर्षे मुक्काम करून बलाढ्य औरंगजेबाला मराठ्यांनी पराभूत केले. अटक ते तंजावर असा मराठी सत्तेचा विस्तार झाला. स्वराज्य स्थापनेनंतर पुढील शंभर वर्षांत स्वराज्य देशभरात पसरले. यातच शिवराज्याभिषेकाचे योगदान दिसून येते,' असे शेटे म्हणाले.

व्याख्यानानंतर उपस्थितांना रायगडाची प्रतिकृती, शिवराज्याभिषेक मिरवणूक, प्रत्यक्ष राज्याभिषेकाचा समारंभ दृकश्राव्य माध्यमातून दाखवण्यात आला. यासाठी विविध चित्रपटांतील दृश्ये, हलता देखावा आणि प्रभावी निवेदन यांच्या माध्यमातून राज्याभिषेक जिवंत करण्यात आला. संयोजन आणि प्रास्ताविक उमेश घोटे यांनी केले.

**Navin Marathi School**
**19/11/2023**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । शनिवार, २५ नोव्हेंबर २०२३

# महात्मा फुले वाड्यात उद्या हेरिटेज वॉक

पुणे : समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात अनमोल योगदान देणारे थोर समाजसुधारक आणि विचारवंत महात्मा जोतिराव फुले यांच्या १३३ व्या पुण्यतिथीनिमित्त महात्मा फुलेंचे निवासस्थान पाहण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. महात्मा फुले पेठ (गंज पेठ) येथील फुले वाड्यात येत्या रविवारी (२६ नोव्हेंबर) सकाळी साडेनऊ वाजता हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'च्या इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. प्रा. दिलीप चव्हाण हे महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समाजकार्याशी, तसेच फुलेवाड्याच्या इतिहासाशी माहिती देणार आहेत. पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वहाणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. इसवी सन १८५२ मध्ये बांधलेल्या या वाड्याला १९७२ मध्ये राज्य संरक्षित वारसास्थळाचा दर्जा देण्यात आला. भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा जोतिराव आणि सावित्रीबाई फुले यांना समर्पित स्मारकात या वाड्याचे रूपांतर करण्यात आले. या वाड्यात महात्मा फुलेंशी संबंधित छायाचित्रे आणि वस्तूंचा संग्रह असलेले संग्रहालयही आहे. अधिक माहितीसाठी उमेश घेरे ९७६२० १२३३२ यांच्याशी संपर्क साधावा.

मटा फोटो



फुले वाडा

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । मंगळवार, २८ नोव्हेंबर २०२३

पुणे PLUS

# क्रांतिपर्वाची उजळणी...

## 'हेरिटेज वॉक'अंतर्गत महात्मा फुले वाडा येथे भेट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

धर्मसत्ता, राजसत्ता आणि अर्थसत्ता यापासून वंचित असलेल्या बहुजनांचे आत्मभान जागविणारे क्रांतिकारक महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाची उजळणी करण्याची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, महात्मा फुले वाडा येथे आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. प्रा. डॉ. दिलीप चव्हाण यांनी त्यांच्या व्याख्यानातून फुले दाम्पत्याचे कार्य आणि फुले वाडा या वास्तूचे अंतरंग उलगडले.



प्रा. डॉ. दिलीप चव्हाण

महात्मा फुले वाडा येथे आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले हे दोघे आपले सांस्कृतिक मायबाप आहेत. धर्मसत्ता, राजसत्ता आणि अर्थसत्ता यापासून वंचित केलेल्या बहुजनांचे आत्मभान त्यांनी जागविले. ख्यातनाम इतिहासकार आणि चरित्रकार धनंजय कीर यांनी महात्मा जोतिराव फुले यांना आमच्या समाजक्रांतीचे जनक असे म्हटलेले आहे,' असे सांगून प्रा. चव्हाण यांनी फुले यांच्या आयुष्यातील विविध घटनांवर प्रकाश टाकला. लहुजीबुवा वस्ताद यांच्याकडे घेतलेली तालीम, थॉमस पेन कृत 'राइट्स ऑफ मॅन' या ग्रंथाचा त्यांच्यावर असणारा प्रभाव, फुले दाम्पत्याने सुरू केलेली मुलींची पहिली शाळा, गृहत्याग, तीन हजार लोकांच्या उपस्थितीत झालेली मुलींच्या शाळेची वार्षिक परीक्षा, 'तृतीय रत्न' या नाटकाचे लेखन, रात्रशाळेची स्थापना, मारेकऱ्यांकडून झालेला हत्येचा प्रयत्न, विधवा पुनर्विवाह मदत, बहुपत्नीत्वाला विरोध, बालहत्या प्रतिबंधगृहाची स्थापना, घरातील हौद सर्वांसाठी खुला करणे, छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा, 'गुलामगिरी' या ग्रंथाचे लेखन, सत्यशोधक समाजाची स्थापना, हंटर आयोगाकडे केलेले निवेदन, टिळक- आगरकरांचा सत्कार, बालविवाह विरोध, विधवांच्या केशवपनास विरोध, महात्मा पदवी या पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला. व्याख्यानानंतर सर्वांनी फुले वाड्यात फेरी मारून वाड्यातील हौद आणि अन्य महत्त्वाच्या जागा पाहिल्या. प्रास्ताविक प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी केले. या कार्यक्रमासाठी राज्य पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहणे यांचे सहकार्य लाभले. उमेश घेरे यांनी संयोजन केले.

**Mahatma Phule Waada**

**26/11/2023**

महाराष्ट्र टाइम्स
# पुणे PLUS
पुणे । शनिवार, २ डिसेंबर २०२३

## 'हेरिटेज वॉक'मध्ये 'बालभारती'ची सफर

पुणे : आपल्या बालपणीची पाठ्यपुस्तके बघायला कोणाला नाही आवडणार... तुम्हालाही पन्नास वर्षांपूर्वीची पाठ्यपुस्तके आणि पुन्हा एकदा शालेय जीवनाच्या आठवणींना उजाळा देण्याची संधी मिळणार आहे. येत्या रविवारी (३ डिसेंबर) सेनापती बापट रस्त्यावरील बालभारती येथे सकाळी दहा वाजता 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या प्रसंगी 'बालभारती'चे संचालक कृष्णकुमार पाटील आणि 'किशोर मासिका'चे कार्यकारी संपादक किरण केंद्रे उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. या प्रसंगी 'बालभारती इयत्ता पन्नास' ही फिल्म दाखवली जाणार आहे. बदलत गेलेली चित्रे, छपाई, बांधणी या सगळ्याची माहिती मिळणार आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# पाठ्यपुस्तकांच्या जगाची रंजक सफर

## 'हेरिटेज वॉक'मध्ये वारसाप्रेमींनी दिली 'बालभारती'ला भेट



किरण केंद्रे



कृष्णकुमार पाटील

म. टा. प्रतिनिधी, पुणे

एकोणिसाव्या शतकातील रसायनशास्त्र विषयाचे पाठ्यपुस्तक, 'नेचर' या जगविख्यात संशोधन पत्रिकेचा अंक, भारतभरातील विविध राज्यांची आणि परदेशातील पाठ्यपुस्तके, 'किशोर' मासिकाचे १९७१पासूनचे अंक पाहण्याची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, सेनापती बापट रस्त्यावरील बालभारती येथे आयोजित 'हेरिटेज वॉक' उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या कार्यक्रमाची सुरुवात 'किशोर मासिका'चे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांच्या संवादाने झाली. त्यांनी १४ नोव्हेंबर १९७१पासून सुरू असणारा या मासिकाचा प्रवास सांगितला. त्यानंतर उपस्थितांना ग्रंथपाल प्रशांत धामापूरकर यांनी ग्रंथालयाची माहिती दिली. येथील १८३७मधील रसायनशास्त्राचे पाठ्यपुस्तक, हजारो कोश, भारत व परदेशातील पाठ्यपुस्तके, नियतकालिके, महाराष्ट्रातील वाचनमाला आणि सुरुवातीपासूनची पाठ्यपुस्तके यांची माहिती दिली. त्यानंतर येथील विक्री विभाग आणि डेपोतील लाखो पुस्तकांची साठवण आणि विक्री कशी होते हे भांडार व्यवस्थापक विनोद अस्मर यांनी सांगितले.

यानंतर उपस्थितांना 'बालभारती : इयत्ता पन्नास' या विषयावरील फिल्म दाखविण्यात आली. 'बालभारती'चे संचालक कृष्णकुमार पाटील आणि पुना गुजराती केळवणी मंडळाचे सहसचिव दिलीपभाई जगड यांनी उपस्थितांशी संवाद साधला. या उपक्रमासाठी संस्थेतील वर्षा सरोदे, अंतर्गत लेखापरीक्षण अधिकारी उज्ज्वला ढेकणे, ईडीपी व्यवस्थापक योगेश लिमये, स्थावर व्यवस्थापक हेमंत बाबर, गणपत शिंगाडे यांनी सहकार्य केले. प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी केले. उमेश पोटे, दिशा गुरव, सानिया सुर्वे, रोहित मेटकर यांनी संयोजन केले.



बालभारती येथे आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

Scanned with OKEN Scanner

**Balbharati**
**03/12/2023**

महाराष्ट्र टाइम्स

# पुणे PLUS

पुणे । शुक्रवार, ८ डिसेंबर २०२३

## 'भांडारकर' संस्थेत उद्या हेरिटेज वॉक



पुणे : महाभारताची संशोधित आवृत्ती तयार करून जगभर संपादनाचा, अभ्यासाचा मानदंड निर्माण करणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरात उद्या, शनिवारी (नऊ डिसेंबर) सकाळी दहा वाजता 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. संस्थेतील अभ्यासक डॉ. श्रीनंद बापट उपस्थितांना माहिती देणार आहेत. याप्रसंगी संस्थेच्या कामकाजाची माहिती देणारी फिल्म, ग्रंथालय, संग्रहालय, ओपन थिएटर, मेकिंग ऑफ मॅन्युस्क्रिप्ट, भारतविद्या प्लॅटफॉर्म, टाटा हॉल या गोष्टी दाखविल्या जाणार आहेत. संस्थेचे प्रमुख भूपाल पटवर्धन श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था ही ऐतिहासिक संशोधन संस्था आहे. सहा जुलै १९१७ रोजी डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या जीवनकार्याचा गौरव म्हणून त्यांच्या नावाने संस्थेची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्र टाइम्स

# पुणे PLUS

पुणे । रविवार, १० डिसेंबर २०२३

## पुणेकरांनी अनुभवला 'भांडारकर'चा इतिहास

### 'हेरिटेज वॉक'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



भूपाल पटवर्धन



श्रीनंद बापट



भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेत आयोजित 'हेरिटेज वॉक'ला पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

दुर्मीळ हस्तलिखिते, पोथ्या, जुन्या वस्तू अशा विविध गोष्टींची माहिती घेऊन पुणेकरांनी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराचा इतिहास जाणून घेतला. शंभर वर्षांतील कार्यामुळे घडलेल्या बदलांची माहिती नागरिकांनी ऐकली. निमित्त होते, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरात झालेल्या 'हेरिटेज वॉक'चे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेत 'हेरिटेज वॉक'चे आयोजन केले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचे मीडिया पार्टनर आहे.

संस्थेतील फिरोदिया सभागृहातून 'हेरिटेज वॉक'ला सुरुवात झाली. ग्रंथपाल गणेश कुंडे यांनी ग्रंथालयातील हजारो दुर्मीळ पुस्तके पुणेकरांना दाखविली. ग्रंथालयातील जुनी पुस्तके, विविध भाषांतील साहित्य पाहून नागरिक अवाक झाले होते. हस्तलिखित विभागात प्राचीन आणि मध्ययुगीन विषयातील हस्तलिखित पोथ्याही दाखविण्यात आल्या. वर्षा पोटफोडे, अमृता नातू यांनी याबाबत माहिती दिली. संग्रहालयातील मध्ययुगीन काळातील जुन्या वस्तू, पोथ्या, जुना टाइपरायटरही उपस्थितांना पाहता आला. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या खुल्या प्रेक्षागृहात जमलेल्या उपस्थितांना प्रेक्षागृहासह ८१ वर्षांपूर्वी संस्कृत अभ्यासक वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांनी लावलेल्या वडाच्या झाडाचे दर्शन घडले.

संस्थेचे निबंधक श्रीनंद बापट यांनी संस्थेच्या कार्यांचा थोडक्यात आढावा घेतला. या वेळी 'हस्तलिखित कसे तयार होते?' याची चित्रफीत दाखविण्यात आली. संस्थेचे प्रमुख भूपाल पटवर्धन यांनी भारत विद्या प्लॅटफॉर्मची माहिती देऊन भविष्यातील उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. १९१७ ते २०२३ या कालावधीतील कार्यांचा आढावा त्यांनी घेतला. एच. व्ही. देसाई महाविद्यालयातील हेरिटेज सेंटरचे संचालक प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड'चे रवी घाटे यांनी हेरिटेज सिटीची माहिती दिली. वरुण पाठक, [illegible] स्नेहा [illegible] यांच्या मदतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Scanned with OKEN Scanner

**Bhandarkar Oriental Research Institute**

**09/12/2023**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । शुक्रवार, १५ डिसेंबर २०२३

# 'चर्च ऑफ द होली नेम'मध्ये शनिवारी 'हेरिटेज वॉक'

**चर्चचा इतिहास, स्थापत्य शैलीची माहिती मिळणार**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

गुरुवार पेठ येथील 'चर्च ऑफ द होली नेम'चा (पवित्र नाम देवालय) इतिहास, स्थापत्य शैली आणि तेथील घंटांची माहिती 'हेरिटेज वॉक'च्या निमित्ताने पुणेकरांना मिळणार आहे. येत्या शनिवारी (१६ डिसेंबर) हा 'हेरिटेज वॉक' होणार आहे.

बीव्हीजी इंडिया लिमिटेड, क्लब हेरिटेज आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. येत्या शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता गुरुवार पेठ (पंचहौद मिशन) येथील 'चर्च ऑफ द होली नेम' येथे 'हेरिटेज वॉक'चे आयोजन केले आहे. या वेळी मनोज येवलेकर आणि भूषण तळवलकर उपस्थितांना माहिती देणार आहेत.

चर्चचा इतिहास, चर्चच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण घटना, अंतर्गत स्थापत्य, परंपरा, समारंभ, चर्चचे कार्य, ऐतिहासिक दफ्तर, विविध ठिकाणांसह सामाजिक संस्था आणि आजवरच्या वाटचालीतील महत्त्वाच्या घटना, चर्चचे अंतर्गत स्थापत्य, चर्चमधील विविध महत्त्वाच्या जागा, चर्चमधील परंपरा, चर्चच्या माध्यमातून आयोजित केले जाणारे समारंभ, कार्य, ऐतिहासिक दफ्तर, चर्चशी संलग्न असणाऱ्या सामाजिक संस्था आणि त्यांच्या उपक्रमांची माहिती चर्चचे सचिव मनोज येवलेकर देणार आहेत. चर्चचे बाह्य स्थापत्य, बेल टॉवर आणि त्यातील आठ सुरांच्या घंटा यांची माहिती भूषण तळवलकर देणार आहेत. बेल टॉवरमधील घंटांवर राष्ट्रगीत वाजवितानाचे रेकॉर्डिंग दाखविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी उमेश पेटे (९७६२०९२३३२) यांच्याशी संपर्क साधावा.

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । मंगळवार, १९ डिसेंबर २०२३

# 'पवित्र नाम देवालया'ची अनुभवली सफर

म. टा. प्रतिनिधी, पुणे



भूषण तळवलकर



हेरिटेज वॉकला उपस्थित वारसाप्रेमी पुणेकर.

पवित्र नाम देवालयामधील 'पवित्र [illegible]' ऐकण्यासाठी [illegible] [illegible] आकृतीने सुशोभित जागा, चर्चचे पहिले भारतीय धर्मगुरू नेहेम्या गोरे यांच्या स्मरणार्थ बसविलेली शिला, 'बेल टॉवर' आदी गोष्टी बघून पुणेकर थक्क झाले.

निमित्त होते, हेरिटेज वॉकचे. 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे 'पवित्र नाम देवालय' येथे हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. चर्चचे सचिव मनोज येवलेकर आणि हेरिटेज अभ्यासक भूषण तळवलकर यांनी उपस्थितांना माहिती दिली.

देसाई महाविद्यालयाच्या हेरिटेज सेंटरचे संचालक प्राध्यापक डॉ. गणेश राऊत यांनी पुण्यातील समृद्ध परंपरा विशद केली. येवलेकर यांनी चर्चचे अंतरंग, स्थापत्य, मुख्य वेदीची रचना, पौराणिक चित्रे, चर्च स्थापनेपासूनचा इतिहास, चर्चमध्ये होणारे उपक्रम, समाजोपयोगी कार्य यांची माहिती दिली.

भूषण तळवलकर यांनी भारतातील चर्च परंपरेचा आढावा घेतला. लंडन येथील 'बिग बेन'वर आधारित [illegible] 'बेल टॉवर' [illegible] माहिती त्यांनी दिली. [illegible] आठ शुद्ध स्वरांमध्ये वाजणाऱ्या आठ मोठ्या घंटा आणि [illegible] अद्भुत रचना उपस्थितांनी अनुभवली. उमेश पेटे यांनी संयोजन केले.

**Panch Haud Mission - Pavitra Naam Devalaya**
**16/12/2023**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । शुक्रवार, २२ डिसेंबर २०२३

# 'युद्ध स्मारका'ला भेट देण्याची संधी

## उद्या 'हेरिटेज वॉक'चे आयोजन



म. टा. प्रतिनिधी, पुणे

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या युद्धांची स्मृती जागविणाऱ्या लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील युद्ध स्मारकाला (नॅशनल वॉर मेमोरियल, सदर्न कमांड) भेट देण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. उद्या, शनिवारी (२३ डिसेंबर) सकाळी १० वाजता येथे 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. 'ऑलिव्ह ग्रीनव्हेंचर फाउंडेशन'चे संचालक कर्नल अवधूत ढमढेरे (निवृत्त) आणि इतिहास अभ्यासक नितीन शास्त्री हे या युद्ध स्मारकाची माहिती देणार आहेत. हे स्मारकस्थळ संपूर्ण दक्षिण आशियातील पहिले युद्धस्मारक म्हणून ओळखले जाते आणि सामान्यांच्या सहकार्याने उभारण्यात आले स्मृतीस्थळ अशी त्याची ख्याती आहे.

या युद्ध स्मारकाचे दोन भाग आहेत. भारतीय स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत जेवढी युद्धे झाली त्यांचा इतिहास दाखविणारे चित्रफलक आणि दुसरा भाग म्हणजे 'सदर्न कमांड म्युझियम.' यात सशस्त्र दलांनी केलेल्या साहसी कामगिरीचा दाखला देणाऱ्या युद्धनौकांच्या प्रतिकृती, विजयंता रणगाडा आणि मिग-२३ या विमानाची प्रतिकृती ठेवण्यात आली आहे. त्याशिवाय विविध प्रसंगांची छायाचित्रेही आहेत. हे सगळे या वॉकमध्ये पाहता येणार आहे.

हा 'हेरिटेज वॉक' सशुल्क असून, युद्ध स्मारकाचे प्रवेशमूल्य वीस रुपये आहे. अधिक माहितीसाठी उमेश घोटे यांच्याशी (९७६२०९२३३२) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । बुधवार, २७ डिसेंबर २०२३

# अद्भुत शौर्यकथांनी वारसाप्रेमी झाले भावूक

## युद्धस्मारकस्थळी 'हेरिटेज वॉक'चे आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे



कर्नल अवधूत ढमढेरे (निवृत्त) आणि नितीन शास्त्री.



युद्धस्मारकस्थळी आयोजित 'हेरिटेज वॉक'ला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'युद्धस्य कथा रम्या.' असे असले, तरी त्या युद्धांमध्ये जे [illegible], त्यांच्या कथा अद्भुत पराक्रमाने भारलेल्या असतात. अशाच अद्भुत शौर्यकथा ऐकताना वारसाप्रेमी भावूक झाले. निमित्त होते, लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील युद्धस्मारकस्थळी आयोजित 'हेरिटेज वॉक'चे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

'ऑलिव्ह ग्रीन व्हेंचर फाउंडेशन'चे संचालक कर्नल अवधूत ढमढेरे (निवृत्त) आणि युद्ध इतिहासाचे अभ्यासक नितीन शास्त्री यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शास्त्री यांनी लष्कराच्या परंपरा, या परिसरातील ध्वज, ध्वजांचे संकेत यांची माहिती दिली. हे स्मारकस्थळ दक्षिण आशियातील पहिले युद्धस्मारक असून, सर्वसामान्यांच्या सहकार्याने ते उभारल्याचे त्यांनी सांगितले. शास्त्री यांनी तीन पोस्ट [illegible] एकट्या [illegible] यांचा पराक्रम सांगितला. या प्रसंगी काडतुसे, विमानविरोधी तोफा, बोफोर्स तोफा दाखविण्यात आल्या. कर्नल ढमढेरे यांनी जमिनीवरच्या युद्धातील महत्त्वाचे शस्त्र असणाऱ्या रणगाड्याची माहिती दिली. येथील संग्रहालयातील भारतीय लष्कराचा पोशाख, सैन्याच्या वापरातील वस्तू, छत्रपती शिवाजी महाराज आणि राजस्थानच्या इतिहासाच्या संदर्भातील स्वतंत्र दालन या सगळ्यांपासून प्रेरणा घेऊन या उपक्रमाची सांगता झाली. दिलीप जगद यांनी उपस्थितांचे स्वागत करून हेरिटेज सेंटर या संकल्पनेची माहिती दिली. प्रा. डॉ. [illegible] यांनी उपस्थितांचे स्वागत करून वक्त्यांचा परिचय करून दिला. आयोजन उमेश घोटे, प्रा. गणेश पवार आणि दिशा गुरव यांनी केले.

**National War Memorial Southern Command**
**23/12/2023**

महाराष्ट्र टाइम्स

# पुणे PLUS

पुणे । शुक्रवार, २९ डिसेंबर २०२३

## महर्षी कर्व्यांचे कार्य जाणून घेण्याची संधी

**'हेरिटेज वॉक'चे शनिवारी आयोजन**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

आपल्या १०४ वर्षांच्या आयुष्यात सलग ७५ वर्षे स्त्री शिक्षणाच्या कार्यात खर्च करणारे महर्षी कर्वे यांचे कार्य जाणून घेण्याची संधी शनिवारी (३० डिसेंबर) रोजी मिळणार आहे.

शनिवारी सकाळी १०.३० वाजता महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था येथे आयोजित 'हेरिटेज वॉक'मध्ये ही माहिती मिळेल.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

स्वतंत्र भारतातील पहिल्या सरकारने 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानासाठी पहिल्याच वर्षी निवडलेल्या तीन व्यक्तींमध्ये एक होते, महर्षी धोंडो केशव कर्वे. त्यांच्याशी निगडित असणारे संग्रहालय आणि संग्रहालयातील 'भारतरत्न' पदक, समाधी दर्शन, अण्णांची कुटी इत्यादी गोष्टी या वेळी दाखविण्यात येणार आहेत.

याच्या जोडीला संस्थेतील विविध प्रकल्प, नव्या-जुन्या संस्थांची माहिती देण्यात येणार आहे. विधवा विवाहोत्तेजक मंडळी, अनाथ बालिकाश्रम मंडळी, महिला विद्यालय, भारतवर्षीय महिला विद्यापीठ, महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ, समता संघ यांचे कार्यही जाणून घेता येईल. 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थे'तील महेंद्र वाघ, सदानंद कुलकर्णी, विकास देशपांडे, पल्लवी बसाळे, उपसचिव प्रदीप वाजे हे माहिती देणार आहेत. संग्रहालयापासून 'हेरिटेज वॉक' सुरू होणार आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी ९७६२०९२३३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

महाराष्ट्र टाइम्स

# पुणे PLUS

पुणे । बुधवार, ३ जानेवारी २०२४

## महर्षींच्या कार्यकर्तृत्वाला अभिवादन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

थोर समाजसुधारक महर्षी कर्वे यांचे कार्यकर्तृत्वाचे वैविध्यपूर्ण पैलू जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, कर्वेनगर येथे आयोजित महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील 'हेरिटेज वॉक'चे. या निमित्ताने महर्षी कर्वेंच्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाला अभिवादन करण्यात आले.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे पदाधिकारी प्राचार्य डॉ. किशोर देसरडा (प्राचार्य, गरवारे वाणिज्य महाविद्यालय) यांनी सगळ्यांचे स्वागत केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेऊन संस्थेच्या प्रगतीची माहिती दिली. संस्थेतील महेंद्र वाघ, सदानंद कुलकर्णी, विकास देशपांडे, पल्लवी बसाळे यांनी संस्थेच्या विविध पैलूंची माहिती दिली.

महर्षी कर्वे यांच्या समाधीपासून 'हेरिटेज वॉक'ला सुरुवात झाली. त्यांची कुटी, महिलाश्रम, वृद्धनिवास, कमिन्स इंजिनीअरिंग कॉलेज; तसेच कर्वे यांना मिळालेले भारतरत्न पदक उपस्थितांना दाखविण्यात आले. स्त्री शिक्षणासाठी कर्वे यांनी घेतलेले कष्ट, या कामात त्यांचे सहकारी, कुटुंबीयांचा सहभाग, त्यांना झालेला विरोध या सगळ्याची सविस्तर माहिती उपस्थितांनी घेतली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात हेरिटेज सेंटरचे संचालक प्रा. गणेश राऊत यांनी 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी,' 'अनाथ बालिकाश्रम मंडळी,' 'भारतवर्षीय महिला विद्यापीठ,' 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' यांची थोडक्यात माहिती दिली. संस्थेचे उपसचिव प्रदीप वाजे यांनी संस्थेच्या भाऊबीज प्रकल्पाची माहिती दिली. उमेश पोटे आणि रोहित मेटकर यांनी आयोजन केले.

**Maharshi Karve Stri Shikshan Sanstha**

**30/12/2023**

महाराष्ट्र टाइम्स

# पुणे PLUS

पुणे । शनिवार, ६ जानेवारी २०२४

पुणे

## जाणून घ्या नदीकाठचे पुणे

### उद्या सकाळी 'हेरिटेज वॉक'

पुणे : मुठा नदीकाठी वसलेली पुनवडी आणि विविध वास्तूंना रंजक इतिहास लाभलेला आहे. हा इतिहास जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. येत्या रविवारी (७ जानेवारी) सकाळी ११ वाजता 'नदीकाठचे पुणे' या 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकमध्ये शहरातील नदीपात्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या मुठा नदीकाठावरील ऐतिहासिक वास्तूंची माहिती या वॉकमध्ये देण्यात येईल.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. या उपक्रमात शहराच्या स्थित्यंतरांचे अभ्यासक व इतिहास संशोधक मंदार लवाटे उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. या वॉकसाठी सर्वांनी शनिवारवाड्याजवळील एच. व्ही. देसाई महाविद्यालयामध्ये सकाळी पावणे [illegible] वाजता उपस्थित राहायचे आहे. संपर्क : उमेश घोटे : ९७६[illegible]

महाराष्ट्र टाइम्स

# पुणे PLUS

पुणे । सोमवार, ८ जानेवारी २०२४

## उलगडला नदीकाठचा इतिहास

### 'हेरिटेज वॉक'मधून वारसाप्रेमींनी घेतली मुठा नदीकाठची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कधी काळी फक्त मुठा नदीकाठी वसलेल्या मानवी वस्तीचे पुण्यनगरीत कसे रूपांतर झाले, याची रंजक माहिती वारसाप्रेमींनी जाणून घेतली. निमित्त होते, मुठा नदीकाठी आयोजित 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे.

शहर अभ्यासक व इतिहास संशोधक मंदार लवाटे यांनी मोडी कागदपत्रांमधून नदीकाठ आणि तिच्या साक्षीने वसलेल्या पुण्याचे अंतरंग उलगडले. 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

या उपक्रमाची सुरुवात एच. व्ही. देसाई महाविद्यालयापासून झाली. नदीकिनारी उभारलेल्या सिद्धेश्वर व अमृतेश्वर मंदिर समूहाची माहिती लवाटे यांनी दिली. तेथील श्री शंकरांचे मंदिर, सूर्यनारायणाची मूर्ती, पांडुरंगाचे मंदिर आणि श्रीरामाचे मंदिर यांची माहिती आणि मूर्तींचे वैशिष्ट्येही त्यांनी समजावली. 'हेरिटेज सेंटर'चे संचालक प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी या मंदिराचे प्रमुख विश्वस्त असणाऱ्या चित्राव घराण्याची माहिती दिली. महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या कार्याची माहिती देऊन प्रा. राऊत यांनी प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन चरित्रकोशासंबंधी माहिती दिली. इंग्रज कालखंडात बांधले गेलेले घोरपडे स्मृतिस्थळ म्हणजेच घोरपडे छत्रीची माहितीही त्यांनी दिली. त्यानंतर वारसाप्रेमींनी आपटे घाट, नेने घाट, दगडी पूल यांची माहिती जाणून घेतली.

छत्रपती शिवाजी महाराज पुलाला झालेली शंभरहून अधिक वर्षे आणि केळकर व मराठी अभियंत्यांचे पूल बांधणीतील योगदान यावर लवाटे यांनी प्रकाश टाकला. पुण्यात दर रविवारी भरणारा कबुतर बाजार, कबुतरांचे प्रकार, [illegible] आणि कबुतरांचे जग यांविषयीही लवाटे यांनी माहिती दिली. या उपक्रमाची सांगता ओंकारेश्वर मंदिराजवळील गंगाधरपंत केळकर आणि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या समाधीजवळ झाली.

राऊत यांनी आभार मानले. उमेश घोटे यांनी आयोजन केले.



मुठा नदीकाठी आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमात सहभागी झालेले वारसाप्रेमी. (इन्सेटमध्ये) मंदार लवाटे

**Nadi Patra**

**07/01/2024**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । शनिवार, १३ जानेवारी २०२४

## पर्वती येथे उद्या 'हेरिटेज वॉक'

**पुणे :** पानिपतचा इतिहास म्हणजे बलिदान आणि शौर्याची गाथा. पानिपतच्या युद्धाचे आणि त्यातील हुतात्म्यांचे स्मरण येत्या रविवारी आयोजित (१४ जानेवारी) 'हेरिटेज वॉक' या उपक्रमात करण्यात येणार आहे.

१४ जानेवारी हा पानिपत युद्धाचा दिवस असल्याने या दिनाचे कृतज्ञ स्मरण करण्यासाठी पर्वती येथे सकाळी नऊ वाजता 'राष्ट्ररक्षक मराठे आणि अब्दाली' या विषयावर लेखक-अनुवादक योगेश फाटक यांचे व्याख्यान होणार आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

या प्रसंगी पर्वतीवरील संग्रहालयात देसाई कॉलेजच्या हेरिटेज सेंटरचे संचालक प्रा. डॉ. गणेश राऊत माहिती देणार आहेत. देवदेवेश्वर संस्थानतर्फे नानासाहेब पेशवे यांना आदरांजली वाहण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अधिक माहितीसाठी उमेश पोटे (९७६२०९२३३२) यांच्याशी संपर्क साधावा.

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । गुरुवार, १८ जानेवारी २०२४

## पानिपतवीरांच्या स्मृतींना दिला उजाळा

म. टा. प्रतिनिधी, पुणे


योगेश फाटक

'संपूर्ण भारतामधून अब्दालीचा प्रतिकार करण्याचे साहस फक्त मराठ्यांनी केले. म्हणून खऱ्या अर्थाने मराठे राष्ट्ररक्षक ठरतात,' या विचारांसह पानिपतमध्ये लढलेल्या वीरांना हेरिटेज वॉक या उपक्रमात अभिवादन करण्यात आले. पानिपतदिनाचे औचित्य साधून या उपक्रमात 'राष्ट्ररक्षक मराठे आणि अब्दाली' या विषयावर योगेश फाटक यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. प्रा. गणेश राऊत यांनी प्रास्ताविकात मराठे आणि अब्दाली यांच्यातल्या युद्धाची पार्श्वभूमी सांगितली. पंजाबी इतिहासकार गंडासिंह यांनी लिहिलेल्या


पर्वती येथे आयोजित हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मूळ इंग्रजी भाषेतील 'अब्दाली' या चरित्राचे मराठी अनुवादक योगेश फाटक यांचे व्याख्यान झाले. अब्दालीचा एक शासक म्हणून उदय, अब्दालीने भारतावर केलेल्या चार स्वाऱ्या, पाचव्या स्वारीत त्याचा मराठ्यांसोबत पानिपतच्या रणांगणावर झालेला रणसंग्राम याची माहिती फाटक यांनी उपस्थितांना दिली. पानिपत युद्धासंबंधीचे काही गैरसमजही त्यांनी खोडून काढले.

श्री देवदेवेश्वर संस्थानचे विश्वस्त रमेश भागवत यांनी युद्धात हौतात्म्य पत्करलेल्या वीरांचे स्मरण करून नानासाहेब पेशवे यांच्या समाधीवर आदरांजली वाहिली. उमेश पोटे आणि रोहित मेटकर यांनी संयोजन केले.

> आधुनिक भारताच्या भवितव्यासाठी निर्णायक असे हे युद्ध ठरले. मराठ्यांचे शौर्य आणि त्यांच्या निःस्वार्थ बलिदानामुळे भारतावरील अब्दालीचे संकट टळले.
>
> - योगेश फाटक, लेखक, अनुवादक

**Devdeveshwar Sansthan, Parvati**
**14/01/2024**



महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेची इमारत.

# ग्रंथोत्तेजक संस्थेत उद्या हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेची माहिती जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. या संस्थेत उद्या, शनिवारी (२० जानेवारी) सकाळी साडेदहा वाजता 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज' आणि 'देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, रा. गो. भांडारकर, ह. ना. आपटे अशा धुरीणांनी इसवी सन १८९४मध्ये ही संस्था स्थापन केली. या संस्थेचे मूळ नाव 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी' असे होते. १८९४मध्ये बुधवार पेठेतील सार्वजनिक काकांच्या 'जोशी महल' या सभागृहात या संस्थेची स्थापना झाली. संस्थेने १८२५ ते १९२५ या शंभर वर्षांच्या कालखंडात मराठी ग्रंथांची सूची तयार केली. संस्थेकडे सहा हजार ग्रंथ असून, त्यातील काही ग्रंथ शंभर वर्षांहून जुने आणि दुर्मीळ आहेत.

या ग्रंथसंपदेचा उपयोग देशभरातील विद्यार्थी संशोधनासाठी करीत आहेत. संस्थेने मराठी ग्रंथरचनेची वाटचाल, पेशवेकालीन समाज आणि प्रशासन हे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. या प्रसंगी संस्थेचे सहकार्यवाह अॅड. डॉ. अ. श्री. चापेकर उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. अधिक माहितीसाठी उमेश पोटे (९७६२०९२३३२) यांच्याशी संपर्क साधावा.



# उजळणी शंभर वर्षांपूर्वीच्या कार्याची



महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभा येथे आयोजित हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

न्यायमूर्ती रानडे यांनी शंभर वर्षांपूर्वी स्थापन केलेली महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था ऊर्फ डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीसारख्या संस्था आजही कार्यरत असून, या संस्था खऱ्या अर्थाने आपले सांस्कृतिक वैभव आहेत, असा विचार आणि या विचारामागे दडलेले कार्य जाणून घेण्याची संधी शनिवारी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, या संस्थेत आयोजित 'हेरिटेज वॉक' उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.



प्रा. डॉ. गणेश राऊत



अॅड. डॉ. अ. श्री. चापेकर

ग्रंथोत्तेजक संस्थेचे सहकार्यवाह अॅड. डॉ. अ. श्री. चापेकर यांनी उपस्थितांना संस्थेची माहिती दिली. ते म्हणाले, 'एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्राला नवचैतन्य देण्याचे काम न्यायमूर्ती रानडे यांनी केले. यात महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेने योगदान दिले आहे. लोकमान्य टिळक, रा. गो. भांडारकर, ह. ना. आपटे या समविचारी सहकाऱ्यांनी न्यायमूर्तींबरोबर इसवी सन १८९४मध्ये या संस्थेची स्थापना केली. शंभर वर्षांच्या कालखंडात संस्थेने मराठी ग्रंथांची सूची केली.' असे चापेकर यांनी सांगितले. वॉकमध्ये सहभागी झालेल्यांना या सूचीसह वैचारिक ग्रंथ परीक्षण योजनेची माहिती, पेशवे दफ्तरातील मूळ मोडी पत्रे आणि त्यांचे देवनागरी लिप्यंतर केलेली पत्रे, संस्थेतील दुर्मीळ ग्रंथ व कागदपत्रेही उपस्थितांना दाखविण्यात आली. हेरिटेज सेंटरचे संचालक आणि इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी न्यायमूर्ती रानडे यांच्या चरित्राचा मागोवा घेतला. संयोजन उमेश पोटे यांनी केले.

Scanned with OKEN Scanner

**Maharashtra Granthottejak Sanstha**
**20/01/2024**

# कलास्थापत्यात रंगले वारसाप्रेमी

म. टा. प्रतिनिधी, पुणे



मंदार लवाटे



अशोक फडणवीस



बेलबाग विष्णूमंदिर येथे आयोजित हेरिटेज वॉकला वारसाप्रेमींची उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पेशवेकालीन कलास्थापत्य, अप्रतिम विष्णूमूर्ती आणि पेशवाईतील मुत्सद्दी नाना फडणवीस यांचे राजकारण जाणून घेण्याची संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते, बुधवार पेठेतील बेलबाग विष्णूमंदिर येथे आयोजित 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे.

बेलबाग येथील 'हेरिटेज वॉक'मध्ये नाना फडणवीस यांचे खापरपणतू

## हेरिटेज वॉक

अशोक फडणवीस यांनी 'मंदिर बांधणीचा इतिहास, भानू घराण्याचा इतिहास, वेळास या जन्मगावाचा इतिहास यांवर प्रकाश टाकला. शहर आणि मोडी अभ्यासक मंदार लवाटे यांनी मनीस मळा, बेलबाग आणि शहरातील बेलबाग यांची माहिती दिली. इसवी सन १७६५मध्ये बांधलेल्या या मंदिराचा इतिहास लवाटे यांनी सांगितला. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांच्या कामगिरीचीही त्यांनी माहिती दिली. या प्रसंगी 'हेरिटेज सेंटर'चे संचालक प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी नाना फडणवीस यांच्या कारकिर्दीला उजाळा दिला. बाळाजी विश्वनाथ यांच्या काळात भट व भानू घराण्याचे स्नेहबंध, पानिपतची लढाई व नाना, थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीतील नानांची कामगिरी, नारायणराव पेशव्यांचे शिक्षण आणि सवाई माधवराव पेशवे, बारभाईंचा कारभार, निजाम आणि टिपू यांना शिकवलेला धडा, नाना आणि इंग्रज यांची माहिती दिली.

वैशालीताई फडणवीस यांनी नानांशी संबंधित पुस्तकांची माहिती दिली. विनय वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. उमेश पोटे यांनी संयोजन केले.

**Vishnu Mandir, Belbaug**
**27/01/2024**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । शुक्रवार, २ फेब्रुवारी २०२४

## 'ऑल सेंट्स चर्च'मध्ये उद्या हेरिटेज वॉक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

खडकी येथील 'ऑल सेंट्स चर्च' पाहण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार असून, या वास्तूचा इतिहास, स्थापत्यशैली आणि जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. उद्या शनिवारी (३ फेब्रुवारी) सकाळी ९.३० वाजता हेरिटेज वॉक या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. खडकी येथील या चर्चची माहिती चर्चच्या व्यवस्थापन समितीचे विश्वस्त नॉर्मन लफ्रि, सचिव नरसिंहन आणि मुख्य धर्मगुरू रेव्हरंड मनोज काटे देणार आहेत. या चर्चला पावणेदोनशेहून अधिक वर्षांचा इतिहास आहे. या चर्चच्या वाटचालीतील महत्त्वाच्या घटना, परंपरा, साजरे होणारे सणसमारंभ, जपून ठेवलेले ऐतिहासिक दफ्तर, चर्चमध्ये केली जाणारी विविध सामाजिक कार्ये आणि शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली जाईल. चर्चचे वैशिष्ट्यपूर्ण बाह्य आणि अंतर्गत स्थापत्य, स्थापनाकाळाचा इतिहास याची माहिती भूषण तळवलकर देतील. इच्छुकांनी सकाळी सव्वानऊ वाजता चर्चच्या चर्चच्या प्रांगणात जमायचे आहे. अधिक माहितीसाठी उमेश पोटे यांच्याशी (९७६२०९२३३२) संपर्क साधावा.

**All Saints Church**
**03/02/2024**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । गुरुवार, १५ फेब्रुवारी २०२४

# वारसाप्रेमी नागरिक रमले तारांगणात

म. टा. प्रतिनिधी, पुणे


विनायक रामदासी

आपल्या शहरातून जगातील इतर शहरांचे अवकाश पाहायला मिळाले तर... ही रंजक संधी वारसाप्रेमींना मिळाली. निमित्त होते टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूल येथील तारांगणात आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे..

..यात पुणेकरांना दिल्ली, मॉस्को, न्यूयॉर्क आणि नॉर्वे येथील अवकाश पाहण्याची संधी मिळाली. त्यासह तारकासमूह, सप्तर्षीद्वारे ध्रुवताऱ्याचा शोध कसा घ्यायचा, वशिष्ठ व अरुंधती यांची गोष्ट, मराठी महिने व नक्षत्रांचा संबंध, बारा राशी व त्यांचे प्रकार, नक्षत्रांची माहिती, ताऱ्यांचे रंग व प्रकार, ताऱ्यांची अंतरे, दोन ताऱ्यांमधील अंतर कसे मोजायचे याची माहिती जाणून घेण्याची संधीही वारसाप्रेमींना मिळाली.


न्यू इंग्लिश स्कूल येथील तारांगणात वारसाप्रेमींनी अवकाशदर्शनासह अनेक रंजक गोष्टी जाणून घेतल्या.

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड', 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूना गुजराती केळवणी मंडळाचे सहसचिव दिलीप जगड होते.

या उपक्रमात प्रसंगी 'तारांगण'चे संचालक विनायक रामदासी यांनी १९५४मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा इतिहास सांगितला. 'या तारांगणातील यंत्रांचे डिझाइन अल्बर्ट आइन्स्टाइन यांनी केले आहे. या तारांगणामध्ये बसून आपण कोणत्याही दिवसाचे, ठिकाणाचे, वेळेचे आकाश बघू शकतो. १९५४ ते १९९५पर्यंत तारांगण चालू होते. पुढे त्यात बिघाड झाला. १९९५ ते २०१० या काळात हे यंत्र बंद अवस्थेत होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे पराग महाजनी, सुनील कुलकर्णी आणि मी असे ते दुरुस्त केले. आइन्स्टाइन यांच्या कल्पनेतील हे एकमेव चालू असणारे यंत्र आहे,' असे रामदासी यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तरांचे सत्र झाले. प्रास्ताविक हेरिटेज सेंटरचे संचालक प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी केले. विनयन वाघमारे यांनी आभार मानले. उमेश पोटे यांनी आयोजन केले.

**New English School**
**09/02/2024**

महाराष्ट्र टाइम्स
पुणे PLUS
पुणे । बुधवार, २१ फेब्रुवारी २०२४

# वारसाप्रेमींनी अनुभवली 'राज'गडाची भव्यता

## 'हेरिटेज वॉक'ला वारसाप्रेमींचा प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'गडांचा राजा उर्फ राजांचा गड' अर्थात राजगडाची भव्यता अनुभवताना वारसाप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फिटले. निमित्त होते, शिवजयंतीच्या औचित्याने आयोजित हेरिटेज वॉक या उपक्रमाचे. एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात स्वराज्याच्या या राजधानीचे त्रिमितीय (थ्रीडी) दर्शन माहितीपटातून घडविण्यात आले.



राजधानी राजगडावरील माहितीपटाला वारसाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. (इन्सेटमध्ये गणेश धालपे.)

'बीव्हीजी इंडिया लिमिटेड,' 'क्लब हेरिटेज' आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालया'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर आहे. इतिहास अभ्यासक गणेश धालपे यांनी राजगडाचे विविध पैलू उलगडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'सारथी' या संस्थेचे प्रमुख अजित निंबाळकर होते, तर व्यवस्थापक अशोक काकडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

धालपे यांनी राजधानी म्हणून राजगडाची सगळी वैशिष्ट्ये दाखविणारा माहितीपट दाखविला. या माहितीपटाची निर्मिती 'इतिहासचक्र' या संस्थेतर्फे करण्यात आली आहे. राजगडाचा इतिहास, मध्ययुग ते शिवकाळापर्यंतची स्थित्यंतरे, पद्मावती, सुवेळा व संजीवनी या अद्वितीय माच्या, बालेकिल्ला, गडावरील पाण्याचे तलाव, दरवाजे, मंदिरे, गडवाटा, वाडे, डोंगरदऱ्या या माहितीसह गडावरील उन्हाळी आणि पावसाळी दृश्ये उपस्थितांना पाहता आली. 'हेरिटेज सेंटर'चे संचालक प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी १९ फेब्रुवारी १६३० या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व सांगितले. काकडे यांनी प्रास्ताविक केले.

'पूना गुजराती केळवणी मंडळा'चे सहसचिव दिलीपभाई जगड आणि प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. 'एच. व्ही. देसाई स्पर्धा परीक्षा केंद्रा'चे प्रमुख नीरव सुरतवाला यांनी आभार मानले. उमेश पोटे यांच्यासह अवधूत बेसके, अभिजित वडके, श्रावण कांबळे यांनी संयोजन केले.

**H. V. Desai College of Arts, Science and Commerce**
**19/02/2024**






















वा. पोतदार सभागृह







